दैनिक अन्यायाचा प्रतिकार, महाराष्ट्राचा बुलंद आवाज
मुख्य संपादक : सुनील कृष्णाजी पोतदार
# रायगड नगरी
www.raigadnagari.com
/ raigadnagari

दैनिक रायगड नगरी
जाहिरातीचे उत्तम माध्यम
या वृत्तपत्रात व्यावसायिक, शैक्षणिक जाहिराती तसेच वारस दाखला, नावात बदल, मिळकत खरेदी-विक्री, सहकारी संस्था, तसेच बक्षिसपत्र बाबतच्या नोटीस प्रसिद्ध करण्यासाठी संपर्क करा.
Publish Your Public Notice, Tender Notice,
Property, Missing Documents, Change of Name ads. in 'Dainik Raigad Nagari'
For Booking....
Call / Whatsapp : 9619737911 / 9619979706
Off : 12, Radha Hari Niwas Complex, Opp.old Ratan talkies, Tilak Road, Panvel. Ph : 022-27469434
Web : www.raigadnagari.com / Email : raigad.nagari@gmail.com

वर्ष २० वे | अंक १७५ | MAHMAR/2006/17212 | रायगड | सोमवार, दि.१५ सप्टेंबर २०२५ | किंमत १ ₹ | पृष्ठे ४ | रायगडसह ठाणे, नवी मुंबई, पुणे येथून प्रकाशित

# हजारो भूमिपुत्रांच्या उपस्थितीत नामकरणाची जोरदार मागणी

## बाळ्या मामा यांच्या नेतृत्वाखाली भव्य कार रॅलीचे आयोजन



**दै.रायगड नगरी । पनवेल/उरण**

माजी खासदार दिबा पाटील यांच्या जन्मशताब्दी व नवी मुंबई विमानतळाला नाव देण्याच्या मागणीसाठी रविवारी भिवंडीचे खासदार सुरेश(बाळ्या मामा) म्हात्रे यांच्या नेतृत्वाखाली भिवंडी ते जासई अशी भव्य कार रॅली काढून जासईत नामकरणासाठी एल्गार करण्यात आला. या रॅलीची सांगता दिबांचे जन्मस्थान असलेल्या जासई येथे करण्यात आली. यावेळी झालेल्या मेळाव्यात दिबा हे देशव्यापी नेते होते. ज्यांनी संयुक्त महाराष्ट्र आंदोलनात कारावास,कूळ कायदा लागू करण्यासाठी परिश्रम घेणारे,ओ बी सा ना आरक्षण मिळविण्यासाठी विरोधी पक्ष नेतेपदाचा त्याग त्याग केला. स्त्री भ्रूण हत्या विरोधी कायदा महाराष्ट्रात लागू करण्याचा पुढाकार झाला.

शेतकऱ्यांना साडेबारा टक्के आणि विकसित भूखंड देणारा कायदा देशासाठी लागू करण्यात आला आहे. यातून याच श्रेय ही दिबांचे आहे. त्यामुळे दिबा पाटील हे राष्ट्रीय नेते आहेत. या राष्ट्रीय नेत्यांच नाव नवी मुंबई विमानतळाला द्यावे अशी जोरदार मागणी केली. या रॅलीत रायगड,ठाणे,पालघर,मुंबई, नवी मुंबई या जिल्ह्यातील समाज हजारोच्या संख्येने उपस्थित होता.

खासदार संजय दिना पाटील, आगरी समजा अध्यक्ष दशरथ पाटील,माजी आमदार मनोहर भोईर, बाळाराम पाटील, राजू पाटील, भावना घाणेकर, संतोष केणे, राजेंद्र पाटील, संतोष घरत, सरपंच जासई निलेश पाटील यांनी प्रास्ताविक केले. यात नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळास दिबा पाटील यांचे नाव देण्याच्या मागणीकडे केंद्र/राज्य सरकारचे लक्ष वेधण्याच्या उद्देशाने या रॅलीचे आयोजन करण्यात आले होते.

या रॅलीची सुरुवात भिवंडी माणकोली येथून सकाळी ९ वाजता करून नवी मुंबईतून पुढे जासई करिता मार्गस्थ झाली. त्यामुळे दिबा पाटील यांच्या त्यागातून साडेबारा टक्के भूखंडाचा लाभ घेतलेल्या प्रत्येकाला आवाहन करण्यात येत आहे की दिबा प्रति कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी जास्तीत जास्त संख्येने रॅली चे स्वागत करण्यासाठी उपस्थित राहावे आणि रॅली मध्ये सहभागी ही व्हावे असे आवाहन करण्यात आले होते.

ही रॅली भिवंडी माणकोली,रेती बंदर खारीगाव, शीळ डोंबिवली कळवा नाका, ठाणे शहर आणि घोडबंदर रोड , दिघा रेल्वे स्थानका समोर (विटावा, आनंद नगर, दिघा , ऐरोली सिमेन्स कंपनी समोर (ऐरोली आणि दिवा ग्रामस्थ), रबाळे रेल्वे स्थानका समोर ( रबाळे, गोठिवली, आणि तळवली ग्रामस्थ), मुलुंड ऐरोली मार्गे, घणसोली नाका ( घणसोली ग्रामस्थ), रिलायन्स गेट (कोपरखैरणे आणि महापे ग्रामस्थ), कोपरी गाव हनुमान मंदिर (कोपरी, पावणे, बोनकोडे आणि जुहूगाव ग्रामस्थ), अरेंजा सर्कल वाशी (तुर्भे, सानपाडा, वाशी ग्रामस्थ), नेरूळ प्रशांत कॉर्नर सिग्नल ( जुईपाडा, शिरवणे, सारसोळे, कूकशेत) करावे चाणक्य सिग्नल (नेरूळ, दारावे आणि करावे ग्रामस्थ), नवी मुंबई पालिका मुख्यालय (बेलापूर, शहाबाज, अग्रोली आणि दिवाळे ग्रामस्थ), दिबा पाटील विमानतळ रेतीबंदर गेट, चिंचपाडा ब्रिज खाली (चिंचपाडा आणि पनवेल ग्रामस्थ), मोठा ओवळा गाव ( पारगाव ओवळा ग्रामस्थ), जासई - लोकनेते दिबा पाटील मंगल कार्यालय येथे सभेने समारोप करण्यात आला.

# महागाव पंचक्रोशीत पुन्हा जमिनीला हादरे; ग्रामस्थ दहशतीत



**दै.रायगड नगरी । पाली/वाघोशी**

सुधागड तालुक्यातील महागाव परिसर पुन्हा एकदा हादरला असून, रविवारी उशिरा रात्रीपासून पहाटेपर्यंत विविध वेळांना मोठमोठे आवाजासह जमिनीला कंप जाणवला. महागाव, भोप्याची वाडी, देऊळवाडी, चंदरगाव व कोंडप या गावांमध्ये सलग बसलेल्या या धक्क्यांमुळे ग्रामस्थ घाबरून गेले आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, रात्री दहा वाजता, मध्यरात्री बारा, पहाटे तीन वाजता, साडेतीन वाजता तसेच सकाळी साडेपाच वाजता हे हादरे बसले. गावकऱ्यांना घरातून बाहेर पडावे लागले असून, परिसरात भीतीचे वातावरण आहे. याआधीही महागाव पंचक्रोशीत असेच हादरे जाणवले होते. त्यावेळी तज्ज्ञांनी हे धक्के भूगर्भातील हालचालीमुळे झाल्याची शक्यता व्यक्त केली होती. वारंवार अशा घटना घडत असल्याने ग्रामस्थ सातत्याने दहशतीत जगत असून, प्रशासनाकडे योग्य तपासणी व मार्गदर्शन करण्याची मागणी होत आहे.

महागाव पंचक्रोशीतील युवा नेते भास्कर पार्टे यांनी सांगितले की, याआधीही आम्ही जिल्हाधिकारी कार्यालय व संबंधित खात्यांना पत्रव्यवहार करून हा प्रश्न मांडला होता. त्या वेळेला हे भूगर्भातील धक्के असल्याचे सांगण्यात आले होते. मात्र आता पुन्हा एकदा धक्के बसल्याने आम्हाला पुन्हा प्रशासनाकडे धाव घ्यावी लागेल, असे ते म्हणाले.

दरम्यान, सुधागड तहसील कार्यालयाकडून तलाठी व सर्कल यांना तातडीने महागाव पंचक्रोशीत पाहणीसाठी रवाना करण्यात आले असल्याचे समजते. या घटनेमुळे प्रशासन कोणती भूमिका घेणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# तडीपार गुन्हेगारास पनवेल तालुका पोलिसांनी घेतले ताब्यात

**दै.रायगड नगरी । पनवेल**

सातारा जिल्हा तसेच पुणे जिल्ह्यातील बारामती, इंदापूर व पुरंदर तालुक्यातून दोन वर्षाकरिता तडीपार असलेल्या सराईत गुन्हेगारास पनवेल तालुका पोलिसांच्या पथकाने चोरीच्या महेंद्रा बोलेरो पिकअप गाडीसह ताब्यात घेतले आहे.

तालुक्यातील अजिवली येथे राहणारे कृष्णा चव्हाण यांच्या ट्रान्सपोर्टची महेंद्रा बोलेरो पिकअप गाडी क्र.एमएच-४६-सीयु-७१२३ ही १० लाख रुपये किंमतीची गाडी चोरीस गेल्याप्रकरणी तक्रार पनवेल तालुका पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आली होती.

यावेळी वपोनि गजानन घाडगे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक आनंद कांबळे, सपोनि अनिरुद्ध गिजे, पोउपनि हर्षल राजपूत, सुभाष डिघे, पो.हवा. धुमाळ, तांडेल, कुदळे, बाबर, देवरे, म्हारसे, पो.शि. भगत, खताळ आदींच्या पथकाने गुप्त बातमीदार व तांत्रिक तपासाच्या आधारे अधिक शोध घेतला असता गाडीवरील चालक निखील उर्फ काळू जाधव (२५) याला ताब्यात घेवून अधिक चौकशी केली असता त्याची गुन्हेगारी पार्श्वभूमीवर असून त्यास सातारा जिल्हा तसेच पुणे जिल्ह्यातील बारामती, इंदापूर व पुरंदर तालुक्यातून दोन वर्षाकरिता तडीपार करण्यात आले आहे.

तसेच फलटण पोलीस ठाण्यात त्याच्यावर विविध गुन्हे दाखल आहेत. या गुन्ह्यातील गाडी पोलिसांनी हस्तगत केली आहे तर त्याचा सहकारी हरी चव्हाण याचा शोध पनवेल शहर पोलीस करीत आहेत.



## संक्षिप्त...


### मुंबई, रायगडसह मुसळधार पावसाची शक्यता

**दै.रायगड नगरी । मुंबई**

अनंत चतुर्दशीनंतर मुंबईमध्ये पावसाने उसंत घेतली होती. सांताक्रूझ येथे दोन दिवस तर, कुलाबा येथे चार दिवस अजिबात पाऊस नव्हता. त्यानंतर शनिवारी, १३ सप्टेंबर रोजी मुंबईत काही ठिकाणी जोरदार पाऊस झाला. महामुंबईत आज, रविवारी आणि सोमवारी तुरळक ठिकाणी मुसळधार पाऊस पडू शकतो. तर, रायगडमध्ये रविवारी आणि रायगड, रत्नागिरीमध्ये सोमवारी ऑरेंज अलर्ट देण्यात आला आहे. मुंबईमध्ये सोमवारपासून पावसाचा जोर कमी झाला. सांताक्रूझ येथे मंगळवार आणि बुधवारी दोन्ही दिवशी सांताक्रूझ येथे शून्य मिलीमीटर पावसाची नोंद झाली. तर कुलाबा येथे शनिवारपर्यंत चार दिवस शून्य मिलीमीटर पाऊस नोंदवला गेला. पावसाने उसंत घेतली असे वाटत असतानाच शनिवारी दहिसर, बोरिवली येथे तास-दीड तास पावसाने जोरदार हजेरी लावली. बोरिवली अग्निशमन दल केंद्र येथे अवघ्या दीड तासात ६८.२ मिलीमीटर पावसाची नोंद झाली. तर प्रबोधनकार ठाकरे नाट्यसंकुल येथे ३४.८ मिलीमीटर पाऊस नोंदवला गेला. मुंबईत सांताक्रूझ केंद्रावर ०.१ मिलीमीटर पाऊस नोंदला गेला. तर, कुलाबा केंद्रावर पावसाची अजिबात नोंद झाली नाही. सप्टेंबरच्या पहिल्या १३ दिवसांमध्ये कुलाबा केंद्रावर जेमतेम ४१.२ मिलीमीटर पाऊस नोंदला गेला आहे. तर, सांताक्रूझ येथे १३३.१ मिलीमीटर पावसाची नोंद झाली आहे. मुंबईमध्ये पावसाळी वातावरण निर्माण झाल्याने मुंबईच्या तापमानाचा पारा ३० अंशांच्या खाली उतरला आहे.

### मुंबई विद्यापीठाकडून सन्मान....

# लोकनेते रामशेठ ठाकूर मोखाडा महाविद्यालयाला सर्वोत्कृष्ट महाविद्यालय पुरस्कार जाहीर



**दै.रायगड नगरी । पनवेल**

मुंबई विद्यापीठाने 'सर्वोत्कृष्ट ग्रामीण महाविद्यालय' पुरस्कारासाठी मोखाडा येथील रयत शिक्षण संस्थेच्या लोकनेते रामशेठ ठाकूर कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालयाची निवड जाहीर केली आहे. उच्च दर्जाचे शिक्षण आणि ग्रामीण भागात शिक्षण क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय कामगिरीबद्दल महाविद्यालयाला हा पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. या पुरस्काराचे वितरण सोमवार दिनांक १५ सप्टेंबर रोजी सकाळी ११ वाजता मुंबई विद्यापीठाच्या कलिना कॅम्पसमधील ग्रीन टेक्नॉलॉजी ऑडिटोरियम येथे एका विशेष समारंभात होणार आहे. तसे पत्र मुंबई विद्यापीठाचे रजिस्टार डॉ. प्रसाद कारंडे यांनी महाविद्यालयाला दिले आहे.

थोर देणगीदार तसेच महाविद्यालयाचे विकास समितीचे प्रमुख व रयत शिक्षण संस्थेचे ज्येष्ठ मॅनेजिंग कौन्सिल सदस्य माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी मोखाडा महाविद्यालयाच्या विकासासाठी मोठे योगदान दिले आहे. या ठिकाणी दर्जेदार शिक्षण विद्यार्थ्यांना मिळत आहे, त्या अनुषंगाने या महाविद्यालयाने प्रगती साधली. अत्यंत दुर्गम भागात असलेल्या या परिसरात विद्यार्थ्यांची तसेच शिक्षक आणि पालकांची मोठी गैरसोय होती. सोयीसुविधांपासून वंचित राहावे लागत होते. त्यामुळे प्रज्ञावंत विद्यार्थ्यांना अडचण भासत होती. आदिवासीबहूल परिसरात १९८४ साली स्थापन झालेल्या या विद्यालयाला उंच भरारी देण्याचे काम लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी केले. लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी मोखाडा विद्यालयाला भेट दिली त्यावेळी त्यांनी येथील परिस्थिती बदलवून येथील विद्यार्थ्यांना मुख्य प्रवाहात आणण्याचा निश्चय केला. दुर्गम भागातील विद्यार्थी सक्षम झाला पाहिजे हि लोकनेते रामशेठ ठाकूर यांची कायम तळमळ राहिली आहे त्यामुळे त्यांनी ताबडतोब कार्यवाही केली आणि प्रत्यक्षात निश्चय पूर्ण करीत मोखाडा परिसरातील विद्यार्थ्यांसाठी भव्य स्वरूपात महाविद्यालयाची इमारत साकारली. आज या ठिकाणी दुर्गम भागातील वाडी वस्तीतील विद्यार्थी दर्जेदार शिक्षण घेत आहेत. त्यानुसार उच्च दर्जाचे शिक्षण आणि ग्रामीण भागात शिक्षण क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय कामगिरीबद्दल मुंबई विद्यापीठाकडून लोकनेते रामशेठ ठाकूर मोखाडा महाविद्यालयाला सर्वोत्कृष्ट महाविद्यालय पुरस्कार जाहीर झाला आणि हि बाब रयत शिक्षण संस्था व महाविद्यालयासाठी अभिमानास्पद सन्मानाची आहे.

# माथेरान घाटातील खड्डे-अपघाताला खुले आमंत्रण!
## पाच वाहनांमध्ये मोठा अपघात थोडक्यात टळला



**दै.रायगड नगरी । माथेरान**

माथेरान घाटातील रस्त्यावर पडलेले खड्डे आता अपघाताचे जाळे ठरत आहेत. आज जुमापट्टी येथील कुप्रसिद्ध 'एस-टन' वळणावर एकाच वेळी पाच ते सहा वाहनं समोरासमोर येऊन थांबली, काही वाहनं चढताना मागे सरकली तर उतरणारी वाहनं खड्ड्यांमधून बाहेर काढण्यासाठी धडपड करत होती. सुदैवाने जीवितहानी टळली; पण मोठा अपघात होण्याची चिन्हं ठळकपणे दिसून आली.

माथेरान घाटात मागील मान्सूनपूर्वीची डोंगरावरून वाहिलेली माती दगडाने नैसर्गिक नाले बंद झाले आहेत. ठिकठिकाणी हे दृश्य असून नाले सफाई प्रशासनाने न केल्याने परिणामी रस्त्यावरून पाणी वाहत आहेत, यामुळे रस्त्यावरील डांबर वाहून जाऊन रस्त्याची चाळण झाली काही ठिकाणी खड्डे पडून नाले तयार झालेत आणि खडी रस्त्यावर पसरली आहे.

घाटातील जुनापट्टी या एस टन या वळणावर निसर्गिक नाल्यातील पावसाचे पाणी रस्त्यावर वाहत आहे.

नाले वेळेत साफ न केल्याने हे पाणी रस्त्याच्या मधोमध साचून मोठे खड्डे तयार झाले. परिणामी वाहनचालकांसाठी जीवघेणा प्रसंग निर्माण झाला. पर्यटकांनी व स्थानिकांनी याकडे लक्ष वेधूनही प्रशासनाने नेहमीप्रमाणे कानाडोळाच केला आहे.

आजचा प्रकार तर फक्त सुरुवात आहे. खड्डे भरले नाहीत आणि नाले स्वच्छ केले नाहीत तर या घाटात कधीही मोठ्या प्रमाणावर अपघात होऊन जीवितहानी होणार, यात शंका नाही. स्थानिक नागरिक व वाहनचालकांचा संताप उसळला आहे. माथेरानसारख्या जागतिक दर्जाच्या पर्यटन स्थळी जाणाऱ्या घाटरस्त्यांची ही दुर्दशा हे रेल्वे व सार्वजनिक बांधकाम विभागाच्या निष्काळजीपणाचे मूळ परिणाम आहेत. पर्यटकांचे प्राण धोक्यात घालून प्रशासन नेमके काय साध्य करू पाहते? असा सवाल नागरिक करत आहेत. पर्यटन हंगामाच्या उंबरठ्यावर घाटातील खड्डे तातडीने बुजवले नाहीत, नाले साफ केले नाहीत तर स्थानिक नागरिकांनी मोठ्या आंदोलनाचा इशारा दिला आहे.

# रस्त्यावर धुळीचे साम्राज्य ; प्रवाशी नागरीक हैराण



**दै.रायगड नगरी । उरण**

उरण तालुक्यातील खोपटा पुल ते कोप्रोली आणि चिर्ले ते दिघोडे रस्त्यावर सध्या धुळीचे लोट उचलल्याने प्रवाशी नागरीक हैराण झाले असून प्रवाशांच्या आरोग्यास धोकादायक परिस्थिती निर्माण झाली आहे. तसेच करंजा बंदराकडे जाणारा रस्ता खचल्याने अपघातास धोका निर्माण झाला आहे.

सध्या उरण तालुक्याचा विकास झपाट्याने होत आहे. परंतु विकास कामांना भ्रष्ट राजकारण्यांची किड लागल्याने त्यांचा सामना हा सर्व सामान्य माणसाला सहन करावा लागत आहे.त्यात उरण तालुक्यातील खोपटा पुल ते कोप्रोली आणि चिर्ले ते दिघोडे रस्त्यावर खड्ड्यांचे विघ्न दुर करण्यासाठी चिखल मिश्रित रेती पसरल्याने सध्या या रस्त्यावर मोठ्या प्रमाणात धुळीचे लोट उचलल्याचे चित्र समोर येत आहे.अशा उसळणाऱ्या रसृत्यातून मार्गक्रमण करणाऱ्या प्रवाशी नागरीकांना अनेक समस्यांचा सामना करावा लागत असून त्याचे आरोग्य धोक्यात आले आहे.तर करंजा बंदराकडे जाणाऱ्या रस्त्याचे काम हे निकृष्ट दर्जाचे झाल्याने अल्पावधीतच रसृत्यांची दुरावस्था झाली असून रसृत्यावर खडा पडला आहे. त्यामुळे रात्री अपरात्री अपघाताला धोका निर्माण झाला आहे.

# फॅशनचा राजा

पॅरिस मिलान, लंडन आणि न्यूयॉर्क ही शहरे जगातील 'बीएफएफ' (बिग फोर फॅशन) राजधान्या मानल्या जातात. यात मिलानचे नाव मोठे होण्यात जॉर्जियो अरमानी यांचा वाटा सर्वाधिक होता. पुरुषांच्या व्यक्तिमत्त्वात 'सौम्यता' आणण्यात आणि महिलांच्या व्यक्तित्त्वाचा 'प्रभाव' वाढवण्याची ताकद त्यांच्या पेहरावात होती. अरमानी यांनी ब्रँडेड कपडे, ॲक्सेसरीज, परफ्युम्स, मेकअप, घड्याळे, फर्निचर, हॉटेल्स आणि रेस्टॉरंट्सचे अब्जावधी डॉलर्सचे साम्राज्य निर्माण केले. असंख्य कंपन्यांचे मालक असूनही फोर्ब्सच्या मागच्या वर्षीतील अब्जाधीशांच्या यादीत ते १७७व्या क्रमांकावर होते. पण फॅशन जगतावरील त्यांचे स्थान कायम अव्वल राहिले. अरमानी 'रेड कार्पेट फॅशन'चे जनक होते. ते केवळ कल्पक डिझायनर नव्हते, तर उत्तम उद्योजकही होते. त्यामुळेच अरमानी ग्रुप दरवर्षी सुमारे २,३६,००० कोटी रुपयांची कमाई करत राहिला. आज त्यांचा ब्रँड जगभरात प्रतिष्ठेचा मानला जातो. हे साम्राज्य उभे करण्यासाठी त्यांनी कधी काळी आपले शिक्षणही सोडून दिले होते. पहिल्या महायुद्धानंतर इटलीत फॅसिझमने जोर धरला होता. देशावर बेनितो मुसोलिनीची पकड घट्ट होत होती. याच दरम्यान ११ जुलै, १९३४ रोजी पिआसेंझामध्ये जॉर्जियो यांचा जन्म झाला. त्यांचे आजोबा स्थानिक थिएटर कंपनीसाठी विग बनवण्याचे काम करत. जॉर्जियोचे आजोबा नातवंडांना कामाच्या ठिकाणी घेऊन जात. बाकी सगळे त्यांना आवडत होते; पण त्या केशरचना (विग) त्यांना बिल्कुल आवडत नसत. बनावट किंवा कृत्रिम दिसणारी कोणतीही गोष्ट त्यांना कधीच आवडली नाही. डॉक्टर होऊन लोकांचे जीव वाचवायचे, असे त्यांनी ठरवले. नंतर अशा काही घडामोडी घडल्या की, त्यांच्या हाती सर्जिकल कैचीऐवजी शिवणकामाची कात्री आली. पण सर्जनशीलतेत त्यांचा हात धरणारा कोणीही झाला नाही. ते एका डिपार्टमेंटल स्टोअरमध्ये विंडो ड्रेसर म्हणून काम करायला लागले. स्टोअरच्या खिडक्यांमध्ये कपडे सजवण्याचे काम करता-करता 'फॅशन' जगताची कवाडे त्यांच्यासाठी खुली झाली. हे काम आपल्या आवडीचे आहे, हे लक्षात येताच, त्यांनी 'फॅशन आणि स्टाइल'ची पदवी घेतली. कामातले बारकावे आत्मसात केले. फॅशन ही गोष्ट वारशानेच मिळाल्याने १९६०च्या दशकाच्या मध्यावधीपर्यंत 'डिझायनर' ही ओळख निर्माण झाली. १९७५मध्ये त्यांचे दिवंगत जोडीदार सर्जियो गॅलिओटी यांच्यासोबत अरमानी लग्झरी ब्रँड स्थापन केला. त्यानंतर फक्त सात वर्षांतच 'टाइम' मासिकाच्या मुखपृष्ठावर त्यांचे छायाचित्र झळकले. रूपेरी केस, बटणे नसलेला पांढरा शर्ट आणि काळ्या लेदरचा बॉम्बर जॅकेट, अशा पेहरावातील त्यांचे छायाचित्र म्हणजे फॅशन जगताचे ते अनभिषिक्त राजे आहेत, यावर शिक्कामोर्तब करणारे होते. इटलीत तर 'रे जॉर्जियो' (राजा) असा बहुमान देत त्यांना जनतेने डोक्यावर घेतले होते. हे यश मिळवण्यासाठी त्यांनी काय केले तर, पुरुषांचे सूट हलके, आरामदायी आणि स्टायलिश बनवले. काळ्या किंवा गडद रंगांऐवजी राखाडी आणि बेज रंगात सूट बनवले. जॅकेटच्या बटणांची ठेवण, तलम अस्तर, लेपलचा आकार यांचा अत्यंत बारकाईने विचार केला, जेणेकरून पुरुषांचे 'सौष्ठव' त्यात आकर्षक दिसेल. युरोपात नवश्रीमंत तयार होण्याचे आणि तरुणांमध्ये फिटनेसची आवड वाढण्याचा तो काळ होता. त्यामुळे त्यांची ही स्टाइल शहरी उच्चभ्रू तरुणांना आवडू लागली. इटलीबाहेर त्यांचा दबदबा वाढायला हॉलिवूड कारणीभूत ठरले. दिग्दर्शक पॉल श्रेडर यांनी 'अमेरिकन जिगोलो' चित्रपटातील प्रमुख भूमिकेसाठी रिचर्ड गियरची निवड केली होती. ज्युलियन नावाच्या एस्कॉर्टची भूमिका करताना रिचर्डचं व्यक्तिमत्त्व आकर्षक करण्यासाठी अरमानींचे पेहराव फायद्याचे ठरतील, असा विचार त्यांनी केला. बेज, ग्रे रंगांचे सूट, अप्रतिम जॅकेट्स तयार करून जॉर्जियो यांनी त्यांचा विश्वासही सार्थ ठरवला. सिनेमाने गिअर रातोरात स्टार झाला आणि जॉर्जियोंसाठी हॉलिवूडचे दरवाजे उघडे झाले. त्यानंतर 'द वुल्फ ऑफ वॉल स्ट्रीट', 'गुडफेलास' आणि 'द डिपार्टेड'सह सुमारे दोनशेहून अधिक चित्रपटांसाठी त्यांनी ड्रेस डिझाइन केले. 'द वुल्फ ऑफ वॉल स्ट्रीट'मधल्या लिओनार्दो दि कॅप्रिओचे सूट प्रत्येक दृष्यात नजरबंदी करणारे ठरले. हॉलिवूडचे कलाकार सिनेमा, पुरस्कार सोहळे, अन्य रेड कार्पेट सोहळ्यांसाठी त्यांच्यावर अवलंबून राहू लागले. १९८८मध्ये लॉस एंजेलिसमध्ये शोरूम उघडणारे अरमानी पहिले आंतरराष्ट्रीय डिझायनर ठरले. एकूणच त्यांच्या डिझायनविषयी उच्चभ्रू वर्तुळात मागणी वाढू लागली. पण अरमानी यांनी वेगवेगळ्या आर्थिक स्तरांना परवडतील अशा स्टाइलवर भर दिला. उद्योगांचा पसारा वाढवताना त्यांनी सर्व उद्योग कुटुंबाच्या हातीच ठेवले. नव्याने ब्रँड लाँच केले. जे फारसे फायदेशीर ठरणार नाही, ते ब्रँड वेगळ्या रूपात पुन्हा लाँच केले. १९९०मध्ये प्रख्यात दिग्दर्शक मार्टिन स्कॉर्सेसी यांनी त्यांच्यावर 'मेड इन मिलान' हा लघुपट बनवलाय. त्यात ते म्हणतात, 'मी सुरुवातीला मिलमध्ये काम केले. यंत्रमागांनी भरलेल्या प्रचंड खोल्यांमधील कामगार आपसात बोलत असले तरी त्यांना एकमेकांचे ऐकू येत नव्हते. अशा स्थितीत मी त्या कामाच्या प्रेमात पडेन, असे मला वाटले नव्हते. मग, हळूहळू ते सगळे आवडत गेले'. अरमानी यांच्या कामाचे हेच मोठे वैशिष्ट्य होते. ते आपल्या कामातल्या प्रत्येक गोष्टीकडे जातीने लक्ष देत. अगदी मागच्या आठवड्यात त्यांचा मृत्यू होईपर्यंत त्यांनी काम करणे सोडले नव्हते. स्वतःच्या कंपन्यांचे अध्यक्ष, मुख्य कार्यकारी अधिकारी आणि अगदी कर्मचारी म्हणून जबाबदाऱ्या अतिशय कौशल्याने पार पाडणारे दुर्मिळ असे डिझायनर होते. सोनम कपूर, ऐश्वर्या राय बच्चन यांना अरमानी यांच्या शोमध्ये सहभागी होण्याची संधी मिळाली. पारंपरिक भारतीय कपड्यांचे पेहराव त्यांनी काही वर्षांपूर्वी तयार केले होते. मुंबईत त्याचे शोरूम आणि कॅफेही सुरू झाला आहे. सोनम कपूर, ऐश्वर्या राय बच्चन यांना अरमानी यांच्या शोमध्ये सहभागी होण्याची संधी मिळाली. पारंपरिक भारतीय कपड्यांचे पेहराव त्यांनी काही वर्षांपूर्वी तयार केले होते. मुंबईत त्याचे शोरूम आणि कॅफेही सुरू झाला आहे.

# तळ्याच्या द.ग.तटकरे महाविद्यालयाला मुंबई विद्यापीठाचा सर्वोत्तम महाविद्यालय पुरस्कार

**दै.रायगड नगरी । तळा**

कोकण ग्रामीण भागातील शिक्षणाच्या इतिहासात आणखी एक सुवर्णपान जोडले गेले आहे.येथील तळे विभाग शिक्षण प्रसारक मंडळ संचलित द.ग. तटकरे कला व वाणिज्य महाविद्यालयाने आपल्या बहुआयामी कार्याचा ठसा उमटवत मुंबई विद्यापीठाचा 'सर्वोत्तम ग्रामीण महाविद्यालय' हा बहुमान पटकावला आहे. महाविद्यालयाची २०२३-२४ या शैक्षणिक वर्षासाठी निवड झाली असून,सोमवारी (ता. १५) सप्टेंबरला मुंबई विद्यापीठाच्या कलिना कॅम्पस येथे हा पुरस्कार प्रदान केला जाणार आहे.



बहुजन हिताय, बहुजन सुखाय' या ब्रिदातून १९५१ मध्ये तळा तालुका आणि शहरातील बारा वाड्या प्रतिष्ठित नागरिक आणि ग्रामस्थ यांनी शिक्षण प्रसारक मंडळाची स्थापना केली, पुढे २००१ मध्ये खा.सुनील तटकरे यांचे वडील दत्तात्रय गणपतराव तटकरे यांच्या स्मृतीप्रित्यर्थ त्यांचे नाव महाविद्यालयाला देण्यात आले सध्या महाविद्यालयात कला, वाणिज्य आणि विज्ञान या शाखांमध्ये विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. प्रयोगशाळा, संगणक केंद्र, सुसज्ज ग्रंथालय अशा सुविधा येथे उपलब्ध आहेत. द.ग. तटकरे कला व वाणिज्य महाविद्यालय हे NAAC ए ग्रेड मानांकन प्राप्त संस्थांपैकी एक असून, ग्रामीण भागातील शैक्षणिक दर्जा उंचावणारे, उपक्रमशील महाविद्यालय म्हणून ओळखले जाते. राष्ट्रीय सेवा योजना (छडड), क्रीडा विभाग, सांस्कृतिक विभाग, तसेच डी.एल.एल.ई. (ऊशर्रिीींशपीं ेष डळषशश्रेपस ङशरीपळपस रपव एींशपीळेप) यांच्या माध्यमातून महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी राज्य व विद्यापीठ स्तरावर अनेक पारितोषिके मिळवली आहेत. संशोधनाला चालना देण्यासाठी शोध वेध हा अभिनव उपक्रम राबवून विद्यार्थ्यांमध्ये संशोधनाची गोडी निर्माण करण्याचे महाविद्यालयाचे प्रयत्न विशेष उल्लेखनीय आहेत.शैक्षणिक गुणवत्ता, सामाजिक बांधिलकी, विद्यार्थी-केंद्री उपक्रम, क्रीडा आणि सांस्कृतिक स्पर्धांमधील सहभाग, तसेच राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० च्या प्रभावी अंमलबजावणीसाठी महाविद्यालयाने केलेल्या प्रयत्नांचा सर्वांगीण विचार करून हा सन्मान प्रदान करण्यात आला आहे

या पुरस्कारामुळे महाविद्यालयातील प्राचार्य डॉ. नानासाहेब यादव, प्राध्यापक, कर्मचारीवर्ग आणि विद्यार्थी यांचा उत्साह द्विगुणित झाला आहे. तळे विभाग शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष चंद्रकांत रोडे, उपाध्यक्ष पुरुषोत्तम मुळे, सचिव मंगेश देशमुख, महाविद्यालय विकास समितीचे चेअरमन डॉ. श्रीनिवास वेदक कार्यकारी मंडळाचे सर्व सदस्य तसेच महाविद्यालय विकास समितीचे सर्व सदस्य आणि संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी सर्व कर्मचाऱ्यांचे मनःपूर्वक अभिनंदन करून भविष्यातील प्रगतीस शुभेच्छा दिल्या. संस्थेचे पदाधिकारी, महाविद्यालय विकास समिती, तसेच स्थानिक नागरिकांकडून महाविद्यालयास सतत शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

# कोप्रोली येथे मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान अंतर्गत कार्यशाळा संपन्न

**दै.रायगड नगरी । उरण**

उरण तालुक्यातील कोप्रोली ग्रामपंचायतीच्या वतीने हुतात्मा स्मारक कोप्रोली येथे मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान अंतर्गत गावस्थरिय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.सदर घेण्यात आलेल्या कार्यशाळेत ग्रामपंचायत अधिकारी प्रविण खैरे यांनी उपस्थितांसमोर ग्रामविकास विभागाकडील ६ ऑगष्ट २०२५ चे शासन निर्णयाचे वाचन केले. सदरचे अभियान हे दि.१७ सप्टेंबर २०२५ पासून ते ३१ डिसेंबर २०२५ राबविण्याचे असून,सदर परिपत्रकातील प्रश्नावलीचे केले.हे अभियान यशस्वी करण्यासाठी शासन स्तरावरील सर्वच विभागांनी ग्रामपंचायतीस योग्य ते सहकार्य करण्याचे आवाहन केले आहे. या कार्यशाळेसाठी वैद्यकीय अधिकारी, महसूल अधिकारी, शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षक, अंगणवाडी सेविका, आशा वर्कर, मदतनीस, सी आर पी आरोग्य कर्मचारी व ग्रामपंचायत कर्मचारी उपस्थित होते.

# माणगांवच्या उतेखोल गावात भरवस्तीत घराच्या आवारात आढळून आला भलामोठा अजगर



**दै.रायगड नगरी । उतेखोल/माणगाव**

माणगांव तालुक्यातील उतेखोल गावात भरवस्तीत एका घराच्या आवारात भलामोठा अजगर शिरल्याने गावकऱ्यांमध्ये खळबळ उडाली. मात्र वनविभागाची तत्परता आणि वन्यजीव अभ्यासकासह स्थानिक तरुणांच्या मदतीने या अजगराची सुखरूप सुटका करण्यात आली.

माणगांवचे ग्रामदैवत श्री वाकडाई देवी उतेखोल गावातील होळीच्या माळाजवळ राहणारे प्रवीण जोशी यांच्या घराच्या आवारात भरवस्तीत दि. १४ सप्टेंबर रोजी रात्री १२ च्या सुमारास भला मोठा अजगर आढळून आला, रात्री गावकीची मीटिंग संपल्यानंतर घरी चाललेले राजेश सोंडकर यांच्या निदर्शनास हा अजगर आल्याने त्यांनी त्यांच्या गावातील काही सहकाऱ्यांना कळवले, माजी उपसरपंच अनंत थळकर यांनी तातडीने माणगांवचे वन्यजीव अभ्यासक शंतनु कुवेसकर यांना संपर्क साधला.

माहिती मिळताच ठिकाणी पोहोचत शंतनु कुवेसकर यांनी वनविभागाला देखील पाचारण केले, वनपाल सुजित राजमाने, वनरक्षक पवन चौधरी, अनिल मोरे, सतीश खरात, गोविंद सावकारे अशी वनविभागाची टीम देखील तत्परतेने येथे पोहोचली, गावातील स्थानिक राकेश मढवी, मारुती सांगले यांच्या मदतीने शंतनु कुवेसकर आणि वनरक्षक पवन चौधरी यांनी अजगराला सुरक्षितरित्या पकडले, यावेळी गावातील माजी सैनिक प्रकाश मोरे, माजी उपसरपंच अनंत थळकर, हरेश मढवी आणि प्रवीण जोशी देखील उपस्थित होते.

अजगराला तिथल्या तिथे गावाजवळच सोडण्याचा निर्णय केला असता गावातील तरुण व नागरिकांकडून भीती व्यक्त केली जात होती, हा अजगर लहान मुलांना खाईल, आमच्या पाळीव प्राण्यांना खाईल, अजगराचा खूप मोठ्या प्रमाणात त्रास असतो, पुन्हा गावात येईल असे भीतीपायी काही गावकऱ्यांकडून बोलले जात होते, वन्यजीव अभ्यासक शंतनू कुवेसकर सोबत वनपाल व वनरक्षक यांनी ह्या गावकऱ्यांची समजूत काढत अजगरापासून मानवाला कोणत्याही प्रकारचा थेट धोका व उपद्रव नसल्याचे पटवून दिले त्यानंतर अजगराला कोणत्याही प्रकारच्या गोणत्यात, पिशवीत किंवा पिंजऱ्यात बंधिस्त न करता गावाच्या वेशीवर सुरक्षित ठिकाणी लगेचच सोडून देण्यात आले. या घटनेतून पुन्हा एकदा दिसून आले की, योग्य वेळी केलेली जनजागृती व वनविभागासोबत स्थानिकांची तत्पर साथ मिळाल्यास मानवी जीवन आणि वन्यजीव दोन्हींचे संरक्षण सहजी शक्य होते.


## पनवेलमध्ये पैठणी महोत्सव...

# आ.प्रशांत ठाकूर आणि आ.विक्रांत पाटील यांच्यासह हस्ते प्रदर्शनाचे उद्घाटन

**दै.रायगड नगरी । पनवेल**

रोटरी क्लब ऑफ पनवेल सेंट्रलतर्फे सोनी पैठणी महोत्सव आणि भव्य प्रदर्शन व विक्रीचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमाचे उद्घाटन पनवेल मतदार संघाचे आमदार प्रशांत ठाकूर आणि आमदार विक्रांत पाटील यांच्या हस्ते शुक्रवारी (दि.१२) झाले. या महोत्सवात पनवेलमध्ये प्रथमच खास येवला येथील सोनी पैठणी साड्या थेट ग्राहकांना उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. हे प्रदर्शन आणि विक्री १२ ते १४ सप्टेंबर २०२५ दरम्यान पनवेल शहरातील विरुपाक्ष मंगल कार्यालयात सुरू राहणार आहे.

रोटरी क्लबच्या वतीने नेहमीच समाजोपयोगी उपक्रम राबवण्यात येत असतात. दरम्यान, या उपक्रमांसाठी निधीची गरज असते. हे लक्षात घेता रोटरी क्लब ऑफ पनवेल सेंट्रल ने निधीचे संकलन करण्यासाठी पनवेल मधील विरुपाक्ष मंगल कार्यालयात सोनी पैठणी महोत्सव प्रदर्शन आणि विक्री आयोजित केले आहे. या महोत्सवाच्या उद्धानावेळी रोटरी क्लब पनवेल सेंट्रलचे मार्गदर्शक डॉ. गिरीश गुणे, माजी नगरसेवक प्रथमेश सोमण,



मोहिनी पाटील, प्रेसिडेंट अनिल ठकेकर सेक्रेटरी अतिष थोरात, डॉ. आमोद दिवेकर, डॉ. रमेश पटेल, लक्ष्मण पाटील, डॉ. संजीवनी गुणे, डॉ. कांचन दिवेकर, भागवान पाटील, शैलेश पोटे, फर्स्ट लेडी सारिका ठकेकर, योगेश महाजन, योगेंद्र कुरघोडे, सुदीप गायकवाड, ऋषिकेश बुवा रोटरी क्लब ऑफ पनवेल सेंट्रलचे मार्गदर्शक डॉ. गिरीश गुणे, प्रेसिडेंट अनिल ठकेकर, सेक्रेटरी अतिष थोरात, असिस्टंट गव्हर्नर डॉ. स्वाती लिखिते यांच्यासह रोटरीचे सदस्य आणि महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. दरम्यान, या महोत्सवाला पनवेल महापालिकेच्या माजी महापौर डॉ. कविता चौतमोल, माजी उपमहापौर चारुशीला घरत, माजी विरोधी पक्षनेते प्रीतम म्हात्रे, ममता म्हात्रे यांनी भेट देऊन शुभेच्छा दिल्या.

# पनवेल शहरातील रस्त्यांची पाहणी करून डागडुजी करा

## मा.नगरसेवक ॲड.मनोज भूजबळ यांची पालिकेकडे मागणी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल शहरातील रस्त्यांची पाहणी करून डागडुजी करण्यात यावी, अशी मागणी माजी नगरसेवक ॲड. मनोज भुजबळ यांनी केली आहे. यासंदर्भात त्यांनी मनपा आयुक्त मंगेश चितळे यांना निवेदन दिले आहे..

ॲड. मनोज भुजबळ यांनी निवेदनात म्हटले आहे की, रेसिडन्टस् वेल्फेअर ग्रुप हा नवीन पनवेल मधील जागरुक नागरिकांची संस्था आहे. ही संस्था ही नागरीकांच्या समस्या आणि प्रशासनाकडून वेळो वेळी पुरविल्या जाणाऱ्या सुविधा यावर कार्यरत आहे. माझ्याकडे संस्थेतील पदाधिकारी प्रत्यक्ष भेटून लेखी निवेदन दिले आहे. त्यावरून नागरीकांच्या समस्या आपल्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, नवीन पनवेल तसेच जुने पनवेल परिसरातील रस्त्यांच्या समस्या गंभीर आहेत.

जवळपास सर्वच रस्ते खड्डेमय झालेले आहेत. त्यावरून चालताना किंवा दुचाकी, चारचाकी वाहने घेऊन जाताना किरकोळ आणि गंभीर अपघात होण्याचा धोका वाढलेला आहे.



रस्ते डागडुजी किंवा नविन कंत्राट काढतेवेळी उत्तम प्रतीचे मटेरीयल वापरुन कामे करून घ्यावीत, जेणेकरून प्रशासनाला व नागरीकांना त्रास होणार नाही.

तसेच विनंती वजा सुचना अशी की, ज्या कंत्राटदाराला रस्त्यांचे कंत्राट मिळाले आहे त्यांचे नाव, मोबाईल नंबर हे त्या रस्त्यांच्या एका बाजुला ठळक अक्षरात प्रसिध्द करावे. निवेदनासोबत, न्यु पनवेल रेसिडन्स वेलफेअर ग्रुप यांची तक्रार माहितीस्तव व पुढील कारवाई करीता जोडली आहे.

सिडको
शहरांचे शिल्पकार

## नोटीस-१

साडेबावीस टक्के योजनेअंतर्गत वाटप भूखंडाचे हस्तांतरण "ना हरकत पत्र" मागणी अर्जानुसार नोटीस सर्व १) विलास जगन्नाथ देशमुख २) अरूणा फत्तेसिंग बागराव ३) रमेश दत्तात्रेय धुमाळ ४) शशिकला विठ्ठलराव पायगुडे ५) सरोज वेणीमाधव सोनावणे ६) सुरेखा रामचंद्र देशमुख ७) सुबोध रामचंद्र देशमुख ८) जितेंद्र जगन्नाथ कदम ९) राजेंद्र जगन्नाथ कदम १०) वैशाली संजय देशमुख ११) अपर्णा इंद्रजित जगताप १२) निलेश वसंत देशमुख १३) ज्योती सोमनाथ कदम १४) कल्पना चंद्रशेखर ढमाले १५) जयश्री वसंत देशमुख १६) रोहन रामचंद्र झुंजारराव १७) रोशन रामचंद्र झुंजारराव १८) सारिका रामचंद्र झुंजारराव १९) हरेश गुलाब मांडे २०) वैभव गुलाब मांडे २१) वैजयंती गजानन महिपतराव २२) अक्षरा अरविंद देशमुख २३) रेश्मा निलेश देशमुख, सर्व राहणार - दत्त मंदिराजवळ, गव्हाण, ता. पनवेल, जि. रायगड- ४१० २०६ (अर्जदार).

ज्याअर्थी उपरोक्त अर्जदारांनी खाली उल्लेखीत २२.५% योजनेअंतर्गत त्यांना वाटप करण्यात आलेल्या भूखंडाचे मे. युक्का डेव्हलपर्स प्रा. लि तर्फे डायरेक्टर श्री. नरेश चंद्रकांत बिराजदार यांचे नावे हस्तांतरण करण्याकरीता ना हरकत प्रमाणपत्रासाठी मागणी अर्ज केला आहे. त्यामधील समाविष्ठ भूखंडाचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

| हस्तांतरण अर्ज क्रमांक | अर्जाचा दिनांक | हस्तांतरण करावयाच्या मालमत्तेचा तपशील | | | | वाटप दिनांक | भाडेपट्टा करारनामा तथा भाडेपट्टा करारनामा नोंदणी दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | नोड | सेक्टर | भूखंड क्रमांक | क्षेत्र (चौ.मी.) | | |
| ३५८९ | २१.०८.२०२५ | पुष्पक नोड | २६ | ३८१ | १२२०.०० चौ. मी. | १७.०५.२०२४ | २१.०५.२०२४ |

या नोटीसव्दारे सदर हस्तांतरणाबाबत कोणत्याही हितसंबंधित व्यक्तीस / संस्थेस हरकत / तक्रार नोंदवण्याची असल्यास नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसाच्या मुदतीमध्ये लेखी स्वरूपात आवश्यक त्या पुराव्यासहीत **मुख्य भूमि व भूमापन अधिकारी (भूसंपादन), १ ला मजला, सिडको भवन, सी.बी.डी. बेलापूर** या कार्यालयात सादर करण्यात यावी. उक्त १५ दिवसाच्या मुदतीमध्ये कोणतीही हरकत लेखी स्वरूपात या कार्यालयात प्राप्त न झाल्यास, सदर "ना हरकत प्रमाणपत्र" देणेस कोणत्याही प्रकारची हरकत नाही असे गृहीत धरण्यात येईल व हस्तांतरणाची पुढील कार्यवाही करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

(स्वाक्षरी)
मुख्य भूमी व भूमापन अधिकारी (भूसंपादन)

CIN - U99999 MH 1970 SGC-014574
www.cidco.maharashtra.gov.in

सिडको/जनसंपर्क/२४६/२०२५-२६

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

माथेरान मिनी ट्रेन या वर्षी तरी पूर्ण क्षमतेने धावणार का?

# दिवाळी पूर्वी नेरळ माथेरान फेऱ्यामध्ये वाढ करण्याची मागणी



**दै.रायगड नगरी । माथेरान**

पर्यटकांचे आकर्षण व माथेरानची खऱ्या अर्थाने जीवनवाहिनी समजली जाणारी नेरळ माथेरान मिनी ट्रेन यावर्षी १५ ऑक्टोबर चा मुहूर्त साधणार का ? याची चर्चा सर्वत्र होत असून मागील काही वर्षांमध्ये नेरळ माथेरान मेनी ट्रेन सुरू होण्याकरिता दिरंगाई होत असल्याच्या कारणांनी यावर्षी तरी ही ट्रेन वेळेवर सुरू होईल का अशा शंका माथेरान मधील स्थानिक नागरिक उपस्थित करीत आहे.

माथेरान पर्यटन नगरीचे मुख्य आकर्षण असलेले मिनी ट्रेन सफारी पर्यटकांकरिता एक मेजवानी असते या ट्रेनने नागमोडी वळणे व डोंगर रांगांमधून प्रवास करण्याकरता देश-विदेशातून अनेक पर्यटक माथेरानमध्ये दाखल होत असतात परंतु पावसाळ्यामध्ये सुरक्षिततेच्या कारणावरून नेरळ माथेरान मिनी ट्रेन बंद ठेवण्यात येते परंतु यावेळी अमन लॉज ते माथेरान शटल सेवा मात्र नियमित सुरू असते.पर्यटकांना खरे आकर्षण हे नेरळ माथेरान या सफारी मध्येच वाटत असल्याने यांच्या फेऱ्यांमध्ये वाढ व्हावी अशी सातत्याने मागणी होत असते परंतु रेल्वे प्रशासन मागील काही वर्षापासून त्याकडे दुर्लक्षच करीत असल्याचे निदर्शनास आले आहे.पावसाळ्यात सुरक्षेच्या कारणास्तव १५ जूनला मिनी ट्रेन बंद होत असते परंतु मागील दोन-तीन वर्षांमध्ये रेल्वे प्रशासन या अगोदरच मीनी ट्रेन बंद करण्याची घाई करत आल्याचे चित्र आहे.परंतु मिनिट्रेन सुरू करण्यासाठी मात्र नेहमीच उशीर होत असतो हे लक्षात घेता यावर्षी तरी मिनी ट्रेन वेळेवर सुरू होणार का असा प्रश्न येथील स्थानिक विचारत आहे.

काही वर्षांपूर्वी माथेरानमध्ये नेरळ हुन मिनी ट्रेनच्या पाच फेऱ्या सुरू होत्या पण यावेळेस फक्त दोनच फेऱ्या सुरू करण्यात आल्या होत्या व लवकरच त्या वाढविण्यात येतील असे सांगितले होते परंतु नेहमीप्रमाणे ही पोकळ आश्वासन ठरली होती त्यामुळे यावर्षी तरी मिनी ट्रेनला गत वैभव प्राप्त होताना नेरळ माथेरान फेऱ्यांमध्ये वाढ होणार का अशी मागणी माथेरान करा कडून होत आहे तर नेरळ माथेरान मार्गावरती मिनी ट्रेनच्या फेऱ्या वाढवण्यास रेल्वे प्रशासन अनुत्सुक असल्याचे काही कर्मचाऱ्यांचे म्हणणे आहे. या मार्गावरती धावण्याकरिता बोग्या उपलब्ध नसल्याची धक्कादायक बाब उघड झाली असून ऑक्टोबर महिन्यापूर्वी नवीन बोग्या या सेवेत सामील होणार का हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे.

प्रदीप घावरे म्हणाले की, नेरळ माथेरान सेवा दसऱ्याच्या शुभ मुहूर्तावर रेल्वे प्रशासनाने सुरू करून नेरळ माथेरान सेवेमध्ये वाढ करावी व पूर्वीप्रमाणे येथे वस्तीला येणारी मिनीट्रेन व मालवाहू गाडी पुन्हा सुरू करावी. तर सामाजिक कार्यकर्ते जनार्दन पारटे यांनी सांगितले की, आता खरी वस्तुस्थिती अशी आहे की आता फक्त चार प्रवाशी वर्गाचे कोच लावून या मार्गांवर तीन ट्रेन च्या पेक्षा जास्त ट्रेन चालू शकत नाहीत. त्याचे मुख्य कारण प्रवाशी वर्गाचे कोचेस अनेक नादुरुस्त झाल्यामुळे ते मध्य रेल्वेने भंगारात काढले. त्यामुळे आता सद्या प्रवाशी वर्गाच्या कोचेसची काय पोझीशन आहे हे मी मध्य रेल्वे च्या आणि केंद्रीय रेल्वे मंत्री, मा खासदार अप्पा बारणे यांना निवेदने देऊन नेरळ माथेरान ट्रेन करिता प्रवाशी वर्गाचे डब्बे आणि मालगाडी बोग्या नविन उपलब्ध करून दयावेत यासाठी सतत मागणी करीत आहे.

# जेएनपीए विशेष आर्थिक क्षेत्राने पवनऊर्जा कराराद्वारे शंभर टक्के हरित ऊर्जा साध्य केली

**दै.रायगड नगरी । उरण**

देशातील सर्वात मोठे कंटेनर बंदर असलेल्या जेएनपीएने शाश्वततेकडे मोठी पावले टाकत घोषणा केली आहे की जेएनपीए-विशेष आर्थिक क्षेत्राने (एसईझेड ) आपल्या सर्व कामकाजासाठी शंभर टक्के हरित ऊर्जेकडे यशस्वी संक्रमण केले आहे. या एसईझेडने १ सप्टेंबर २०२५ पासून प्रभावी ठरणाऱ्या ६.० मेगावॅट ग्रिड-कनेक्टेड पवनऊर्जेच्या खरेदीसाठी नव्या अल्पकालीन ओपन ॲक्सेस करारावर स्वाक्षरी केली आहे. या करारान्वये वीज खरेदीचा दर केवळ रु. ३.१२ प्रति युनिट (केडब्ल्यूएच) इतका कमी होणार आहे.

एक परवानाधारक म्हणून, जेएनपीए एसईझेड वीज मंत्रालयाने निश्चित केलेल्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार, खुल्या प्रवेशाद्वारे ग्राहकांसाठी वीज खरेदी करते. ऑगस्ट २०२१ मध्ये स्थापन झाल्यापासून, एसईझेड पारंपारिक स्त्रोतांकडून ६.३० रुपये केडब्ल्यूएच दराने वीज मिळवत आहे. हे संक्रमण पर्यावरणीय आणि आर्थिकदृष्ट्या एक महत्त्वाचा टप्पा आहे, ज्यामुळे खर्च कमी करताना हरित ऑपरेशन्स सक्षम होतात.हे पाऊल जेएनपीए एसईझेडच्या पर्यावरणीय जबाबदारी, कार्बन उत्सर्जन कमी करणे आणि शाश्वत औद्योगिक विकासासाठीच्या वचनबद्धतेला बळकटी देते, ज्यामुळे देशभरातील इतर आर्थिक क्षेत्रांसाठी एक उदाहरण स्थापित होतो.

हे यश जेएनपीएच्या प्रभावी हरित उपक्रमांकडे वाटचाल करण्याच्या अथक प्रयत्नांना अधोरेखित करते आणि बंदर आणि लॉजिस्टिक्स क्षेत्रासाठी शाश्वत भविष्य घडवण्यात त्यांच्या नेतृत्वाला अधोरेखित करते.जेएनपीएमध्ये आम्ही ठामपणे मानतो की शाश्वतता आणि प्रगती ही हातात हात घालून पुढे जायला हवी. आमच्या एसईझेडचे शंभर टक्के हरित ऊर्जेकडे झालेले संक्रमण हे जबाबदार व भविष्याभिमुख औद्योगिक परिसंस्था घडवण्याच्या आमच्या दृष्टीकोनाचे प्रतिक आहे.या उपक्रमामुळे केवळ पर्यावरणावरील आमचा परिणाम कमी होत नाही.

तर एसईझेडमध्ये कार्यरत उद्योगांसाठी स्पर्धात्मक फायदेही निर्माण होतात. या हरित बदलाचे नेतृत्व करून जेएनपीए भारतातील शाश्वत, बंदर-केंद्रित औद्योगिक विकासाला गती देणारा आघाडीचा घटक असल्याची पुन्हा एकदा पुष्टी करत असल्याचे जेएनपीएचे अध्यक्ष व व्हीपीप-ीएलचे अध्यक्ष, व्यवस्थापकीय संचालक उन्मेष वाघ यांनी या यशाबद्दल म्हटले म्हटले आहे.जेएनपीए एसईझेड आमच्या नोड-टू-नेटवर्क धोरणातील महत्त्वाचा दुवा आहे, ज्यामुळे आम्हाला टर्मिनल सेवांच्या पलीकडे जाऊन सर्वसमावेशक पोर्ट परिसंस्थेतील आमची भूमिका बळकट करता येते असेही वाघ यांनी म्हटले आहे.

# चाकूचा धाक दाखवून पळणारा माथेफिरू बुलेटस्वार अपघातात गंभीर जखमी

**दै.रायगड नगरी । कोर्लई**

मुरुड -साळाव रस्त्यावर मजगांव ते नांदगाव दरम्यान शाळेतील काही विद्यार्थ्यांनींना चाकू दाखवून अनुचित प्रकार करुन पळणारा माथेफिरू बुलेटस्वार दुपारी बाराच्या सुमारास बारशिव खिंडीत झालेल्या अपघातात गंभीर जखमी झाला. श्रीवर्धन तालुक्यातील दिघी- सर्वा येथील कल्पेश देवधरे (३७) असे या माथेफिरू बुलेटस्वाराचे नाव आहे.

शुक्रवारी दुपारी १२:३० च्या दरम्यान मुरुड तालुक्यातील बार्शी व गावाजवळ अनुचित प्रकार घडला दिघी सर्वे येथील या माथेफिरू इसमाने नांदगाव शाळेतील काही मुलींसमोर चाकू दाखवून विनयभंग करून अशांतता निर्माण करण्याचा प्रयत्न केला परंतु त्या मुलींनी त्यावेळी आरडाओरड करून आजूबाजूचे रहिवाशी यांना सावध केले त्याच क्षणी तेथे असलेल्या काही मुलांनी मोटर सायकलने त्याचा पाठलाग केला असता बारशिव खिंडीतील वळणावर भरधाव वेगाने जाणाऱ्या बुलेटचा नियंत्रण सुटल्याने मुरुड कडे जाणा-या एका एस .टी.बसला धडकून,एस .टी.च्या व स्वतःच्या नुकसानीस कारणीभूत ठरुन स्त्याच्या बाजूला असलेल्या कुंपणात गंभीर जखमी अवस्थेत पडला.

सदर घटनेचे वृत्त समजताच रेवदंडा पोलिसांनी घटना स्थळी धाव घेऊन सदर जखमी बुलेटस्वाराला नजिकच्या बोर्ली मांडला प्राथमिक आरोग्य केंद्रात नेण्यात आले, नंतर जिल्हा रुग्णालयात व तेथून मुंबई ला हलविण्यात आले असून पुढील तपास रेवदंडा पोलिस ठाण्याचे निरीक्षक श्रीकांत किरवले यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस शिला ठाकूर करीत असल्याचे समजते.

# अटकेची धमकी देत केली २५ लाखांची फसवणूक

**दै.रायगड नगरी । पनवेल**

सीबीआय ऑफिसर असल्याचे सांगून कुलाबा पोलिस ठाण्यात फसवणुकीचा गुन्हा दाखल आहे त्यात अरेस्ट करत आहोत असे सांगून २६ लाख सहा हजार आठशे रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी राजेश मिश्रा आणि विक्रांत सिंग राजपूत यांच्या विरोधात पनवेल तालुका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

शशांक शेखर दासरॉय हे कोप्रोली, कोणार्क रिवर सोसायटी येथे राहत असून ते सेवानिवृत्त आहेत. त्यांना व्हिडीओ कॉल आला आणि सीबीआय ऑफिसर, कुलाबा पोलिस ठाणे अशी ओळख सांगून फसवणुकीच्या गुन्ह्यात हाऊस अरेस्ट करण्यात येत आहे असे सांगितले. व्हिडीओ कॉल कट केला तर कधीही पोलिस घरी येतील असे सांगितले. त्यानंतर विक्रांत सिंग असे नाव सांगून मी प्रोफाईल फोटो बदलत आहे असे सांगितले. तुम्ही गुन्ह्यातील मुख्य संशयित असल्याचे सांगून मनी लॉन्ड्रिंग आणि फसवणुकीच्या गुन्ह्यात सहभाग असल्याचे निष्पन्न झाले असल्याची माहिती दिली. सेंट्रल ब्युरो ऑफ इन्व्हेस्टिगेशनचे १ चिन्ह असलेले दोन लेटर हेड असलेले लेटर पाठवून तुम्हालासुद्धा अटक होऊ शकते, असे बोलून त्यांनी पोलिसांसोबत आरोपीचे फोटो असलेले तीन फोटो व्हॉट्सॲपवर पाठवले. माझे नाव या प्रकरणातून कसे ३ काढता येईल, अशी विनंती शशांक यांनी केली असता त्यांनी बँक खात्याची माहिती देण्यासाठी विचारणा केली. त्यांनी सांगितल्याप्रमाणे २६ लाख ६ हजार आठशे रुपये पाठवले. त्या क्रमांकावर ३ संपर्क साधून झालेल्या केस बाबत विचारणा केली असता संपर्क झाला नाही. याची माहिती त्यांनी त्यांच्या मुलाला दिली. यावेळी मोबाइल चेक करून पाहिले असता फसवणूक झाल्याचे त्याने सांगितले.


## जाहीर नोटीस

सर्व तमाम जनतेस या जाहीर नोटीशद्वारे कळविण्यात येते की, (१) सौ. प्रतिभा प्रभाकर बोरुकर (२) श्री. अभिजीत प्रभाकर बोरुकर, रा. सिडको फायर च्या मागे, ए-२, २०१, अंबिका नगर, जे.एच. टीमबाडीया, सेक्टर नं. १९, पनवेल, जि. रायगड, यांचे मालक आहेत. यांची मौजे नवीन पनवेल पश्चिम, ता. पनवेल, येथील रोड नं. ३/४, प्लॉट नं. २४, सेक्टर नं २, बिल्डिंग नाव. द सुप्रीम इंडस्ट्रीज को. ऑप. हौ. सोसा.लि, शॉप क्र. ०८, तळ मजला, ज्याचे क्षेत्रफळ १२.३७ चौ. मी. बांधीव व २.०६ चौ. मी. पोटमाळा आहे. वरील मालमत्तेबाबत मागील मूळ कागदपत्रे गहाळ आहेत.

०४/०९/२००९ रोजी मे. एस. एस. एन्टरप्राजेस तर्फे भागीदार सुनिल पी. बांठिया., आणि श्री. करीमउदीन शेख यांच्यामार्फत विक्रीसाठी मूळ करार, दुय्यम निबंधक पनवेल १-०६४५३-२००४ येथे नोंदणीकृत खांदेश्वर पोलिस ठाण्यातील येथे सदर कागदपत्रे गहाळ झाल्याची पोलिस तक्रार ०९/०९/२०२५ रोजी मिसिंग येथे नोंदवण्यात आली आहे.

जर कोणाला कागदपत्रे गहाळ झाल्यामुळे सदर मालमत्तेवर हक्क, मालकी हक्क, हितसंबंध असतील किंवा बँकेकडे सदर मालमत्ता गहाण ठेवण्यावर कोणताही आक्षेप असेल, तर त्यांनी या सूचनेचे प्रकाशन झाल्यापासून १४ दिवसांच्या आत सर्व सहाय्यक कागदपत्रांसह त्यांचा/तिचा दावा असल्यास, अधोस्वाक्षरीकर्त्यास कळवावे, अन्यथा वर उल्लेख केलेल्या मालमत्तेवरील (१) सौ. प्रतिभा प्रभाकर बोरुकर (२) श्री. अभिजीत प्रभाकर बोरुकर, यांचे हक्क सर्व भार, धारणाधिकारमुक्त मानले जातील.

दि.१४/०९/२०२५

सही/-
**ॲड. अमित दशरथ शिरवले**
**मो.नं. ९८६७३५२४७८**

**शॉप नं. २, गुरु प्रेम को. ऑप. हौ. सोसा.लि., प्लॉट नं. १९, सेक्टर नं. ८, खांदेश्वर पोलीस स्टेशन जवळ, नवीन पनवेल (प), ता. पनवेल, जि रायगड - ४१० २०६.**



## गाळा विकणे आहे

**नवीन कोर्टा समोर दुकानी (शॉप) ६५० स्के फुट गाळा विकणे आहे. इच्छुकांनी संपर्क करावा.**

**9892181313**



## वाचकांसाठी विनम्र सूचना

'दै.रायगड नगरी' वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध प्रकारच्या जाहिरातीतील मजकुराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनासंदर्भात वा सेवेसंदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची 'दै.रायगड नगरी' वृत्तपत्र कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पूर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.



## CHANGE IN NAME

My Old Name was **Riwa Ashok Kolekar** As per Gazzete No.(M-25185640), I will be known as **Kolekar Riwa Ashok (New Name)** Residing at : Flat No.605, Parth Building, Plot No.A 95, Sector 06, Karanjade, Panvel, Raigad,

**Kolekar Riwa Ashok (Sd/- New Name)**



**श्री.एम.एस. लिगाडे सो यांचे न्यायालयात**
सह दिवाणी न्यायालय व. स्तर, बेलापूर

पोलीस स्टेशन : सानपाडा
केस क्रमांक: SCC ३१४५/२०२३
गु.र.नं.:
Exh : 14

**आरोपी व्यक्तीला उपस्थित राहण्यासाठी पर्थावणारी उद्घोषणा (कलम ८२)**

ज्याअर्थी माझ्यापुढे अशी फिर्याद दाखल करण्यात आली आहे की, आरोपी नामे शाम वी. मेनन, रा. डी/२७ १:१, स्नेहबंधन सोसायटी से ३, सानपाडा, नवी मुंबई

याने भारतीय दंड संहितेचे कलम एन आय ॲक्ट कलम १३८ अन्वये, शिक्षापात्र असलेला चेक बाऊन्स हा अपराध केला आहे. (किंवा त्याने तो केल्याचा संशय आहे) व त्यावर काढलेल्या अटक वॉरंटवर उक्त आरोपी हा सापडु शकत नाही असे प्रतिपादन करण्यात आले व त्याअर्थी आरोपी हा फरारी झाला आहे. (उक्त वॉरंटची बजावणी टाळण्यासाठी स्वतःला लपवीत आहे) असे मला समाधानकारकरित्या दाखविण्यात आले आहे.

त्याअर्थी, याद्वारे अशी उद्घोषणा करण्यात येत आहे की, उक्त आरोपी रा. वरील प्रमाणे याने दिनांक ७/१०/२०२५ रोजी बेलापूर येथे या न्यायालयापुढे (किंवा माझ्यासमोर) उक्त फिर्यादीला उत्तर देण्यासाठी उपस्थित राहणे आवश्यक आहे.

दि.११/०९/२०२५
वर्ग ठिकाण : बेलापूर

सही/-
**६ वे सह दिवाणी न्यायाधिश व प्र. न्यायदंडाधिकारी, व.स्तर, बेलापूर**



## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते कि, खालील परिशिष्टात नमूद केलेली मिळकत लिलाधर नाथा ठाकूर यांच्या मालकी हक्क व कब्जेवहिवाटीची असून आमचे अशिलांसोबत खालील परिशिष्ट मिळकत विक्री करणेकामी बोलणी चालू असून तत्पूर्वी कोणाची काही तक्रार, हरकत असल्यास ती समजणेकामी सदर नोटीस देणेत येत आहे.

खालील परिशिष्टात मिळकत पूर्णतः निर्वेध, निजोखमी, निष्कर्जी व बोजारहित असून विद्यमान मालकास खालील परिशिष्टातील मिळकतीचे पूर्ण पणन योग्य हक्क व अधिकार आहे. असा भरवसा व खात्री विद्यमान मालकाने आमचे अशिलास दिलेली आहे. तथापि, सदरील मिळकतीवर विद्यमान मालकाचे व्यतिरिक्त अन्य कोणाचाही कोणत्याही प्रकारचा गहाण, दान, लीन, पोटगी, अन्न, वस्त्र, कोर्टवाद, चार्ज, वाटप, दावा, वारसाहक्क, मृत्यूपत्र, वहिवाट, अदलाबदल, करार, खरेदीखत, मुखत्यारपत्र, विरोधी कब्जा अगर तत्सम कोणत्याही प्रकारचा हक्क, अधिकार, हितसंबंध वगैरे असल्यास संबंधितांनी सदरील नोटीस प्रसिद्ध झालेपासून ०७ दिवसांचे आत मूळ कागदपत्रांनिशी आमचे खालील पत्त्यावर येऊन खात्री द्यावी. सदर मुदतीमध्ये हरकत न आल्यास खालील परिशिष्टातील मिळकत पूर्णतः निर्वेध, निजोखमी, निष्कर्जी व बोजारहित असून विद्यमान मालकास खालील परिशिष्टातील मिळकतीचे पूर्ण पणन योग्य हक्क व अधिकार आहेत. कोणाचेही कोणत्याही प्रकारचा काही एक, अधिकार व हितसंबंध नाही. असल्यास तो त्यांनी जाणीवपूर्वक सोडून दिलेला आहे. असे समजून आमचे अशिल ठरलेप्रमाणे पुढील व्यवहार पूर्ण करतील. मुदतबाह्य हरकत विचारात घेतली जाणार नाही.

परिशिष्ट :- तुकडी रायगड, पोटतुकडी, तालुका उरण, मे. दुय्यम निबंधक, उरण, रायगड, जिल्हा रायगड तसेच जिल्हा परिषद रायगड, हद्दीतील मौजे पिरकोन, येथील मिळकत भूमापन नं. २३०/३६ यांसी क्षेत्र ०.१३.५० हे. आर. प्र., पोटखराबा ०.००.०० हे. आर. प्र. यांसी आकार रक्कम रुपये ०.४२ पैसे, यांसी चतुःसीमा वहिवाटीप्रमाणे आहेत.

येणेप्रमाणे वर्णनात्मक जमीन, जोडहक्क, अधिकार व हितसंबंधासहित दरोबस्त.

रायगड, तारीख : १५ सप्टेंबर २०२५.

सही/-
**श्री. विनायक र. ताम्हणकर, वकिल**
**खरेदीदारा तर्फे वकिल,**
**३०२, जय आशापुरा रेसिडेन्सी, शनी नगर, मांजर्ली, बदलापूर (प.) ४२१५०३.**
**भ्रमणध्वनी क्र. ८६६८५५१३१२.**



## जाहीर नोटीस

सूचना देण्यात येते की, प्रेमिला कावस नाझीर यांनी असे प्रतिपादन केले आहे की, खालील परिशिष्टात वर्णन केलेल्या मिळकतीचे (यापुढे जिचा उल्लेख सदरहू मिळकत असा केला आहे) ते एकमेव मालक आहेत (यापुढे ज्यांचा उल्लेख सदर जमिन मालक असा केला आहे). सदरहू मिळकत जी ऋणभारविरहीत आणि खुला व शांततापूर्ण ताबा असलेली अशी सदरहू मिळकतीचे विद्यमान जमिन मालक प्रेमिला कावस नाझीर यांच्याकडून आमचे अशिलांनी खरेदी घेण्याचे ठरवले आहे. विक्री, गहाणपत्र, भाडेकरार, अभिहस्तांकन, न्यास, देणगी, लिअन, हवाला, ताबा, सुविधाधिकार, वारसाहक्क, याव्दारे किंवा अन्यथा कशाही प्रकारे उक्त मालमत्तेत किंवा त्यावर किंवा तिच्या कोणत्याही भागावर कोणताही हक्क, हितसंबंध, दावा किंवा मागणी असणा-या सर्व व्यक्तींना तो लेखी स्वरूपात संबंधित कागदपत्रांसहित जे नोटराईज्ड करून साक्षांकित केलेले असतील ते खालील नमुद पत्त्यावर आजच्या प्रसिध्दीच्या तारखेपासून १४ दिवसांत कळविण्याची विनंती करण्यात येते, अन्यथा सदर मुदतीनंतर सदरहू मिळकत निष्कर्जी व निर्वेध आहे असे गृहीत धरून सदर मिळकतीवर कोणताही हक्क, हितसंबंध, दावा किंवा मागणी असल्यास सोडून दिल्याचे किंवा मागे घेतल्याचे समजण्यात येईल व सदर विक्री व्यवहार पूर्ण करण्यात येईल. आमचे अशील सदरची मिळकत सदर जागा मालकांकडून कायमखुष रजिस्टर खरेदीपत्र पूर्ण करून घेतील व त्यानंतर कोणचीही कसलीही तक्रार / हरकत आमचे अशिलांचेवर सदर निळकतीवर बंधनकारक राहणार नाही. म्हणून दिली जाहीर नोटीस

**परिशिष्ट**

मौजे कोळगांव, तालुका अलिबाग, जिल्हा रायगड यांचे हद्दीतील, मे. दुय्यम निबंधक अलिबाग यांचे कक्षेतील खालील वर्णनाची जमिन मिळकतः

| गट क्रं. | लागवड योग्य क्षेत्र आणि पोटखराबा असे एकूण क्षेत्र हे.आर.चौ.मी. | जमीन मालकाचे एकूण क्षेत्र चौ.मी. |
|---|---|---|
| (१) | (२) | (३) |
| ३३८ | ०.१०.१०<br>+०.०१.००<br>०.११.१० | स्तंभ (२) मध्ये नमुद केलेले संपूर्ण शेत मिळकत क्षेत्र |

दिनांक : १५/०९/२०२५

सही/-
**चैतन्य सुनिल स्वंदारे**
**ॲडव्होकेट**
**ऑफीस १३१७ दलामाल टॉवर, फ्री, प्रेस मार्ग, नरिमन पॉईंट, मुंबई**



## जाहीर नोटीस

सर्व लोकांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, खालील नमुद केलेली मिळकत ही श्री. मोहम्मद अरशद सिद्यीकी यांचे नांवे आहे. सदर मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे आहे.

**मिळकतीचे वर्णन : मौजे कुडावे, ता. पनवेल, जि. रायगड**

| मालक/कब्जेदाराचे नांव | सर्व्हे नं./ हिस्सा नं. | एकूण क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार |
|---|---|---|---|
| श्री.मोहम्मद अरशद सिद्यीकी | ८/२ | ०-२१-० | ३-९४ |

मौजे कुडावे, ता. पनवेल, जि. रायगड येथील वर नमुद मिळकतीचे जमिन मालक ७/१२ मधील नमुद कब्जेदार श्री. मोहम्मद अरशद सिद्यीकी यांची वरील नमुद जमिन मिळकत आमचे अशिलांनी कायमस्वरुपी विकत घेण्याचे ठरविले आहे.

सदर नमुद केलेल्या जमीनीच्या मिळकतीमध्ये कोणत्याही व्यक्तीचा अथवा व्यक्तिच्या कोणत्याही संस्थेचा गहाण, दान, बक्षिस, खरेदी खत, साठेकरार, मिळकत विकसीत करणेबाबतचा करार, कुळहक्क, वहीवाटीचा हक्क, ताबा हक्क, भाडेपट्टा, पोटगी, मृत्युपत्र, बोजा अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास त्याच्या लेखी हरकती, त्यांचे हरकतीतील नमूद केलेल्या हक्काबाबत प्रथम दर्शनी योग्य त्या पुरेश्या कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांच्याकडे ही नोटीस प्रसिध्द झाले पासून ७ दिवसाच्या आत प्रत्यक्ष येवून अथवा रजिस्टर्ड पोस्टाने पाठवावेत. याप्रमाणे मुदतीत हरकती न असल्यास सदर मिळकत निर्वेध आहे. असे समजून आमचे अशिल वर नमूद केलेले मालक / कब्जेदाराबरोबर ठरविलेला कायम खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील व वरील मुदती नंतर आलेली कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही.

ठिकाण : पनवेल
दिनांक : १५/०९/२०२५

सही/-
**ॲड.नयन पी. पाटील**
**ॲडव्होकेट हायकोर्ट**
**बी-१०१, योगेश्वर कृपा बिल्डींग, प्लॉट नं.५६, ठाणा नाका रोड, पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड-४१०२०६**
**मो.नं.८६८६५१९००१**



(मे.राणे सो)

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात

दि.चौ.अर्ज क्र.८५०/२०२५
नि.नं.७/ड
ने.ता.२६/०९/२०२५

१) सौ. दिपा अशोक ढमाले
वय. ७२ वर्षे, धंदाः- गृहीणी,
२) श्री. संकेत अशोक ढमाले
वय. ४० वर्षे, धंदाः- नोकरी,
दोघेही राहणार - सदनिका क्र. ब १०३,
प्लॉट नं. ए ४५, सेक्टर-२३, जीबीएस. दारावे
नेरूळ, नवी मुंबई, जि. ठाणे, महाराष्ट्र ४००७०६ ... अर्जदार

विरुध्द

कोणीही नाही ... सामनेवाला

१. ज्याअर्थी अर्जदार क्र. १ यांचे पति व अर्जदार क्र. २ यांचे वडील कै. अशोक कोंडाजी ढमाले हे दिनांक २७/१०/२००४ रोजी के. १५, बीएआरसी क्वार्टर पोस्टल कॉलनी रोड, चेंबूर येथे त्यांच्या राहत्या घरी मयत झालेले आहेत. तसेच कै. अशोक कोंडाजी ढमाले यांच्या आई कै. सावित्रीबाई कोंडाजी ढमाले हया दिनांक २८/०८/२०१० रोजी के. १५, बीएआरसी क्वार्टर पोस्टल कॉलनी रोड, चेंबूर येथे त्यांच्या राहत्या घरी मयत झालेल्या आहेत.

२. कै. अशोक कोंडाजी ढमाले यांचे स्वकष्टार्जित व मालकीची तसेच ताबेकब्जातील तसेच नावे असलेल्या मौजे : पनवेल, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड येथील खालील वर्णनाची निवासी सदनिका मिळकत आहे.

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे - पनवेल, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड, येथील पीएल-५-बी/८/३/१६, सेक्टर-१४, क्षेत्र ३०.५० चौ.मी. या वर्णनाची निवासी सदनिका.**

कै. अशोक कोंडाजी ढमाले यांचे वर नमूद मिळकतीस अर्जदार हेच वारसदार आहेत असा वारसदाखला मिळण्यासाठी अर्जदार यांनी दि. चौ. अर्ज पनवेल येथील मे. दिवाणी न्या. कनिष्ठ स्तर यांच्या कोर्टात दाखल केलेला आहे.

त्याअर्थी सदर वर नमुद केलेल्या मिळकतीस कै. अशोक कोंडाजी ढमाले यांचे अर्जदार हेच वारसदार असल्याबाबत अर्जदार यांचे नावाने वारसदाखला देण्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाच्या आत या न्यायालयात हजर राहून हरकत कळवावी. वरील मुदतीत हरकत न आल्यास नोटीसीच्या मुदतीनंतर अर्जदार यांचे नावाने वारसदाखला दिला जाईल. मात्र मागाहून कोणाचीही हरकत किंवा तकार ग्राहय धरली जाणार नाही.

आज तारीख १०/९/२०२५ रोजी माझ्या सही शिक्क्यानिशी दिली.

**सही/- क.लिपीक दि.न्या.क.स्तर, पनवेल**
**कोर्टाचा शिक्का**
**सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.क.स्तर, पनवेल**

# रोह्यात शिंदे शिवसेनेच्या पक्षप्रवेशाला राष्ट्रवादीची ठसन

**दै.रायगड नगरी । धाटाव**

गेली कित्येक वर्ष राजकारणात आढळ स्थान निर्माण केलेले व जनतेच्या मनावर अधिराज्य गाजवणारे खासदार सुनील तटकरे यांचा नावाचा करिष्मा आजही कायम आहे. काही दिवसांपूर्वी शिवसेनेत विविध पक्षांच्या कार्यकर्त्यांचा जाहीर प्रवेश झाला. त्यास राष्ट्रवादीकडून ठसन म्हणून लांढर गावचे युवा नेतृत्व युवा सेनेचे तालुकाप्रमुख राम महाडिक यांनी कुठल्याही पक्षात न जाता राष्ट्रवादी पक्षात स्वगृहीत परतून खासदार सुनील तटकरे यांच्या उपस्थितीत जाहीर प्रवेश केला.



व्यासपीठावर महिला बाल विकास मंत्री आदिती ताई तटकरे माजी आमदार अनिकेत तटकरे,विजयराव मोरे राज्य सरचिटणीस, रामचंद्र सकपाळ, अनिलजी भगत माजी उपसभापती, जयवंत मुढे युवक अध्यक्ष, अमित मोहीते वरसे मा. सरपंच, महेश बामुगडे, सतिश भगत मा.सरपंच दत्ता चव्हाण गट अध्यक्ष, यशवंत रटाटे गण अध्यक्ष, हरिश्चंद्र माने माजी उपसरपंच, अंतोष शिर्के ग्र. सदस्य, लक्ष्मण भगत सदस्य, गणेश टेंबे मा सद्स्य,न थुराम माने तळाघर सरपंच, संतोष माने, मयुर मुंढे, मंगेश देवकर रोठ सदस्य उपस्थित होते.

यावेळी खासदार सुनील तटकरे यांनी विचार व्यक्त करताना १९८५ च्या माझ्या आमदारकीच्या निवडणुकीत लांढर गावाने मला ९० टक्के मतदान केले होते आज गावच्या विकासाच्या मुद्द्यावर तरुण पिढी एकत्र येऊन राष्ट्रवादी पक्षात प्रवेश करत आहे. याचा मला निश्चित आनंद आहे. धाटाव औद्योगिक वसाहतीमध्ये कमी अधिक प्रमाणात रोजगार चा प्रश्न निर्माण झाला असेल मात्र मी खासदार झाल्यापासून रोजगार संदर्भात जातीने लक्ष घालत आहे दिल्ली येथे अनेक नेत्यांची माझी चर्चा होत आहे घाटाव मध्ये नव्याने रोजगाराच्या संधी निर्माण करता यावेत यासाठी माझे प्रयत्न आहेत त्यामुळे रोहा माणगाव परिसरात येत्या चार वर्षात मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मिती होणार असून सुमारे दहा हजार लोकांना रोजगार उपलब्ध होईल असे खासदार सुनील तटकरे म्हणाले राम महाडिक यांच्यासारख्या उमद्या तरुण नेतृत्वा ने राष्ट्रवादी पक्षात चांगले काम करण्यास संधी देऊ असे ते शेवटी म्हणाले.

तर समज गैरसमजरातून दूर गेली लोक एकत्र येत आहेत. राष्ट्रवादी पक्षात प्रवेश करीत आहेत. खासदार सुनील तटकरे साहेबांनी एमआयडीसीच्या माध्यमातून धाटाव परिसरातील अनेक गावांना सुमारे १४ कोटीचा निधी दिला. सर्वांचे श्रद्धास्थान असलेले महादेव मंदिरा करता साडेपाच कोटीचा निधी दिला. अशी विविध कामे मार्गी लागले असून याची पोच पावती म्हणून राष्ट्रवादी पक्ष या ठिकाणी वाढताना दिसत आहे त्यामुळे धाटाव ग्रामपंचायतची मतपेटी जशी राष्ट्रवादीच्या मतांनी फुल भरते त्या पद्धतीत इतर ग्रामपंचायतीच्या सुद्धा मतपेट्या राष्ट्रवादीच्या मतांनी फुल भरतील असा विश्वास अनिकेत तटकरे यांनी व्यक्त केला.

तर उबाटा मध्ये मी युवा सेनेचा तालुका प्रमुख होतो पक्ष सोडत असताना कुठल्या पक्षात जाऊ अशी घालमेल मनाची झाली होती. परंतु राजकारण हे सक्षम नेतृत्वाचे काम असून ते नेतृत्व म्हणजे खासदार सुनील तटकरे आहेत विकास म्हणजे सुनील तटकरे यामुळे राष्ट्रवादी पक्षात प्रवेश करण्याचा निर्णय घेतला भविष्यात नव्या उमेदीने राष्ट्रवादी पक्षाचे काम जोमाने करणार असे वक्तव्य प्रवेश करते युवा नेतृत्व राम महाडिक यांनी केले

दरम्यान येत्या काहीच महिन्यात जिल्हा परिषद पंचायत समितीच्या निवडणुका होणार आहेत त्याकरता विविध पक्षाच्या नेत्यांनी पक्षप्रवेशाचा सिलसिला सुरू ठेवला आहे लांढर येथील राम महाडिक यांच्यासह प्रकाश धाडसे, संतोष शिंदे ,देवेंद्र मोहिते, विवेक शिंदे, कुंदन माने,यशवंत शिंदे ,अभिषेक शिंदे, अनिकेत शिंदे, साहिल खेरटकर, सौरभ खेरटकर, भावेश तांबे, प्रतीक धाडसे, महेश भगत आदी सह असंख्य ग्रामस्थांनी केलेला पक्षप्रवेश हा राष्ट्रवादीसाठी महत्वपूर्ण ठरणार आहे. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सतीश भगत यांनी केले.

# एसटीची जागा भाडेपट्टा करारावर खासगी संस्थाच्या घशात

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

प्रवाशांना चांगल्या सुविधा देण्यासाठी जिल्ह्यातील अलिबागसह अन्य एसटी बस स्थानकांचे भूमीपूजन करण्यात आले. मात्र, अनेक वर्षे उलटूनही काही स्थानकांची अपूरी कामे व नुतनीकरण झाले नाही. परंतु, एसटीची तीच जागा भाडेपट्टा करारावर खासगी संस्थाच्या घशात घालण्यात आल्या आहेत. त्यामुळे स्थानकाच्या नुतनीकरणाचे काम फक्त कागदावरच, अशी परिस्थिती निर्माण झाली आहे.



महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या रायगड विभागाच्या अखत्यारित अलिबाग, पेण, रोहा, कर्जत, महाड, श्रीवर्धन, मुरूड व माणगाव असे आठ एसटी बस आगार असून २० हून अधिक बस स्थानके आहेत. जिल्ह्यात ४७० हून अधिक एसटी बसेस असून एसटीला महिन्याला ३५ लाखहून अधिक उत्पन्न मिळते. तसेच, एसटीतून १ लाखाहून अधिक प्रवासी प्रवास करतात. असे असतानाही प्रवासी वर्गाला नाहक त्रासाला सामोरे जावे लगात आहे.

जून्या स्थानकांना गळती लागण्याबरोबरच प्रवाशांना बसण्यासाठी असलेल्या प्रतिक्षा कक्षात पुरेसी जागानाही. त्यामुळे स्थानकांमधील प्रवाशांसह कर्मचाऱ्यांची गैरसोय दुर करण्यासाठी एसटी महामंडळाने काही वर्षापूर्वी रायगड जिल्ह्यातील अलिबागसह अन्य स्थानकांचे नुतनीकरण करण्याचा निर्णय घेतला होता. अद्ययावत अशी कार्यालये, सर्व सोयी सुविधांसह सुसज्ज असे फलाट व प्रतिक्षा कक्ष या स्थानकांमध्ये होणार होते. त्यामुळे प्रवासी वर्गात आनंदाचे वातावरण निर्माण झाले होते. मोठा गाजावाजा करीत जिल्ह्यातील बस स्थानकांच्या कामांचे भूमीपूजन करण्यात आले होते. त्यानंतर जागांचे माती परिक्षण झाले. नवीन स्थानके उभारण्याची हालचाली सुरु झाल्याने हे काम लवकर होईल, अशी आशा प्रवाशांना होती. परंतु, त्यांची मोठी निराशा झाली आहे.

# भाजपाच्या जनसंपर्क कार्यालयाचा उद्घाटन सोहळा व नवीन पदाधिकाऱ्यांचा सत्कार सोहळा संपन्न

**दै.रायगड नगरी । उरण**

उरण तालुक्यातील जनतेच्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी उरण द्रोणागिरी नोड येथे स्थापन करण्यात आलेल्या भाजपाच्या जनसंपर्क कार्यालयाचा उद्धाटन सोहळा तसेच भाजपच्या नवीन पदाधिकाऱ्यांचा सत्कार सोहळा पनवेलचे आमदार प्रशांत दादा ठाकूर व उरणचे आमदार महेश बालदी यांच्या उपस्थितीत मोठ्या धुमधडाक्यात पार पडला.यावेळी हनुमान कोळीवाडा गावचे माजी सरपंच गौरव शेठ कोळी यांची तालुका उपाध्यक्ष उरण शहर मंडळ या पदावर नियुक्ती करण्यात आली आहे.

उरण तालुका भारतीय जनता पार्टी पक्षाच्या वतीने शनिवारी( दि १३) उरण द्रोणागिरी नोड येथे आयोजित करण्यात आलेल्या जनसंपर्क कार्यालयाच्या उद्धाटन तसेच नवीन पदाधिकारी यांचा सत्कार सोहळा पनवेलचे आमदार प्रशांत दादा ठाकूर, आमदार महेश बालदी यांच्या उपस्थितीत मोठ्या धुमधडाक्यात पार पडला.याप्रसंगी युवा नेतूत्व तथा हनुमान कोळीवाडा गावचे माजी सरपंच गौरव कोळी यांची तालुका उपाध्यक्ष उरण शहर मंडळ पदावर नियुक्ती करण्याचे पत्र पनवेल आमदार प्रशांत दादा ठाकूर यांच्या हस्ते देण्यात आले.तसेच तालुक्यातील इतर भाजपच्या कार्यकर्त्यांची विविध पदांवर नियुक्ती करण्याचे पत्र उपस्थितांच्या हस्ते देण्यात आली.भाजपाचे विचार घराघरात पोहचवून, सर्वसामान्य माणसाच्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी आमदार महेश बालदी, आमदार प्रशांत दादा ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली प्रयत्न करणार असल्याचे ग्वाही नवनिर्वाचित पदाधिकारी गौरव कोळी यांनी बोलताना दिली. यावेळी पनवेलचे आमदार प्रशांत दादा ठाकूर,उरणचे आमदार महेश बालदी यांनी नवनिर्वाचित पदाधिकारी यांचे अभिनंदन करुन जनसंपर्क कार्यालयाच्या माध्यमातून जनतेच्या हितार्थ निर्णय घेण्याचे आश्वासन दिले.याप्रसंगी उत्तर रायगड भाजपचे जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, जेष्ठ नेते प्रितम म्हात्रे,भाजपा महाराष्ट्र राज्य परिषद सदस्य रवि शेठ भोईर, उत्तर रायगड जिल्हा उपाध्यक्ष चंद्रकांत घरत,मंडल अध्यक्ष उरण तालुका शहर प्रसाद भोईर,मंडल अध्यक्ष उरण तालुका ग्रामीण धनेश गावंड,भाजपा उरण द्रोणागिरी नोड अध्यक्ष शेखर पाटील, शहराध्यक्ष कौशिक शहा,भाजपचे तालुका उपाध्यक्ष पंडित पाटील,माजी सरपंच जितेंद्र म्हात्रे, युवा नेते समीर मढवी,माजी सरपंच सुशिल राऊत,रुपेश भुजबळ,माजी नगराध्यक्षा सौ सायली म्हात्रे, महिला नेत्या सीमाताई घरत,माजी उपनगराध्यक्ष जयवंत कोळी,प्रदिप नाखवा, शशिकांत म्हात्रे, रमाकांत म्हात्रे,शिक्षक नेते बबन पाटील आदिंसह भाजपचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.



# ‘माझं कुंकू माझा देश’चा जाज्वल्य हुंकार; ठाकरेंच्या शिवसैनिकांचा पाकिस्तानविरुद्ध एल्गार

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

आशिया कप २०२५ मधील भारत-पाकिस्तान क्रिकेट सामन्याचा उत्साह जगभरात असला, तरी महाराष्ट्रात संतापाचा ज्वालामुखी फुटला आहे. पहेलगाम येथील भ्याड दहशतवादी हल्ल्यानंतर पाकिस्तानचा हात उघड झाल्याने संपूर्ण देशभरातून संतापाची लाट उसळली असून, अशा रक्तरंजित पार्श्वभूमीवर भारताने पाकिस्तानशी क्रिकेट खेळणे हा शहिदांच्या बलिदनाचा अपमान असल्याचा ठाम सूर उमटू लागला आहे.



या पार्श्वभूमीवर शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाने ‘माझं कुंकू माझा देश’ या राज्यव्यापी आंदोलनाचा जाज्वल्य हुंकार देत पाकिस्तानविरोधी एल्गार पुकारला आहे. अलिबाग येथे या आंदोलनाला महिलांचा उत्स्फूर्त सहभाग लाभला. महिला आघाडीच्या महिला अग्रभागी उभ्या राहून भाजप कार्यालयासमोर कडकडीत निदर्शने केली. या वेळी रायगड महिला संघटिका शिल्पा घरत, उपजिल्हा संघटिका दर्शना पाटील, विधानसभा तालुका संघटिका तनुजा पेरेकर, मुरुड तालुका संघटिका राजश्री मिसाळ, अलिबाग उपतालुका संघटिका लीना घरत, अलिबाग शहर संघटिका राखी खरवले, चौल ग्रामपंचायत माजी सरपंच रूपाली म्हात्रे, मुरुड विभाग प्रमुख मनाली पाटिल, ग्रामपंचायत सदस्य जागृती पिटकुर, संचिता भोईर आणि अलिबाग उपशहर प्रमुख सलोनी गिरी या सर्वजणींचा अग्रणी सहभाग होता.

रायगड जिल्हाप्रमुख सुरेंद्र म्हात्रे यांच्या मार्गदर्शनाखाली शिवसैनिकांनी अलिबाग येथील मध्यवर्ती कार्यालयातून भव्य मोर्चा काढला आणि थेट भाजप कार्यालयासमोर भारत माता की जय, पाकिस्तान मुर्दाबाद, माझं कुंकू माझा देश अशा प्रखर घोषणांनी संपूर्ण परिसर दणाणून गेला. आंदोलनाच्या ठिकाणी संतापाची लाट ओसंडून वाहत होती.

पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी ठामपणे सांगितले की, पाकिस्तान सतत भारताविरुद्ध दहशतवादी कारवाया करतो.

अशा देशाशी क्रिकेट खेळणे हा शहिदांच्या रक्ताचा अपमान आहे. जोपर्यंत पाकिस्तान दहशतवादाला पाठिंबा देणं थांबवत नाही, तोपर्यंत भारतीय संघाने पाकिस्तानशी सामना खेळू नये. केंद्र सरकारने या संदर्भात ठोस भूमिका घेत देशाच्या जिव्हाळ्याचा प्रश्न मानून निर्णायक पावले उचलली पाहिजेत.

आज राज्यभर पेटलेलं ‘माझं कुंकू माझा देश’ आंदोलन हा केवळ क्रिकेट सामन्याला विरोध नसून, शहिदांच्या बलिदानाचा सन्मान राखण्यासाठी केलेला जाज्वल्य हुंकार आहे. रायगड जिल्ह्यातील अलिबागेत शिवसैनिकांचा लढाऊ उत्साह पाहून पाकिस्तानविरोधी भूमिकेचा ठाम संदेश देशभर पोहोचल्याचं स्पष्ट झालं आहे.

# शस्त्र परवाना उत्तरप्रदेशचा, वापर महाराष्ट्रात; दोघांना अटक

**दै.रायगड नगरी । पनवेल**

शस्त्र परवाना देताना तो कुठल्या भागासाठी आहे हे स्पष्ट केले जाते. तसेच या बाबत परवाना घेणाऱ्या व्यक्तीला सांगितलेही जाते . तरीही राज्या बाहेर परवानगी नसताना अग्निशस्त्र बाळगल्या प्रकरणी दोन संशयित व्यक्तींना अटक करण्यात आली आहे. या शस्त्रा सोबत असणारी ११ जीवंत काडतुसे हि जप्त करण्यात आली आहेत.

प्रवीणकुमार लालताप्रसाद पांडे (वय ३२ मूळ जोनपूर उत्तरप्रदेश) आणि विकास त्रिपाठी (४५) राहणार मूळ प्रतापगढ उत्तरप्रदेश. असे अटक करण्यात आलेल्या संशयित आरोपींची नावे आहेत. प्रवीणकुमार हा सध्या उलवा येथे दूध डेअरीचा व्यवसाय करतो तर विकास त्रिपाठी हा बांधकाम व्यवसायात आहे. उलवा येथील सेक्टर २० संविधान चौकातुन जिओ कडे जाणाऱ्या मार्गिकेवर गुन्हे प्रतिबंधक पथक गस्त घालत होते. पहाटे सव्वाचारच्या सुमारास प्रवीणकुमार पांडे हे आपल्या गाडीतून जात होते. गस्त पोलीस कर्मचारी भीमराव नाईकवाडी यांनी संशयवातून गाडी थांबवली. गाडीची झडती घेतली असता त्यात एक अग्निशस्त्र आणि ११ जीवंत काडतुसे आढळून आले. याबाबत विचारणा केली असता हे शस्त्र परवाना धारक असल्याचे सांगण्यात आले. मात्र पोलिसांनी अधिक चौकशी केली असता हे शस्त्र विकास त्रिपाठी यांच्या नावे असल्याचे समोर आले.

पोलिसांनी पुढील चौकशी साठी प्रवीणकुमार याला पोलीस ठाण्यात नेऊन चौकशी केल्यावर त्याने दिलेल्या माहिती वरून विकास त्रिपाठी याला ताब्यात घेतले गेले. त्याच्याशी केलेल्या चौकशीत शस्त्र परवाना असून तो केवळ प्रवीणकुमार याच्या कडे दिले होते असे समोर आले. कागदपत्र पाहणीत शस्त्र परवाना होता मात्र वापर करण्याचा परवाना केवळ उत्तरप्रदेश राज्य असल्याने महाराष्ट्रात असे शस्त्र वापर करणे बाळगणे गुन्हा आहेच शिवाय शस्त्र केवळ परवाना धारकाने जवळ बाळगण्याचा स्पष्ट नियम असल्याने तो प्रवीण याला देणे हे गुन्हा आहे.

पोलिसांनी त्या दोघांनाही अटक केली आहे. त्यांच्या कडील ६ लाख रुपयांची गाडी, ९० हजार ६०० रुपयांचे अग्निशस्त्र, २१ हजार रुपयांचे ११ काडतुसे असा एकूण ६ लाख ९२ हजार ७०० रुपयांचा ऐवज जप्त करण्यात आला आहे. संशयित आरोपींनी उत्तरप्रदेश मध्ये शस्त्र वापर परवाना असताना महाराष्ट्रात का आणले. त्यामागे काही कट आहे का ? याबाबत अधिक चौकशी सुरु आहे. अशी माहिती उलवा पोलिसांनी दिली.

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहिर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकती माझे अशिल श्री. गणेश महेश सिंग याने खरेतीखत करून प्रस्ताविक जमिन मालक श्री. देवभूमि रिअल्टी प्रा.लि. ऑफिसचा पत्ता : देवभूमी CKV टेकपार्क, एलसेक डिव्हीजनच्यासमोर डर्डो, रवियाल व्हिलेज, रणगारेड्डी डिस्टिक्ट, रगी एअरपोर्टजवळ टेलंगना, इंडिया ५०१५१०, डायरेक्टर सौ. विजयालक्ष्मी भावीनेनी यांच्यातर्फे ऑथोराईज पर्सन श्री. दिगंबर ज्ञानदेव पाटील या जमीन मालकाकडून विकत घेण्याच्या विचारात आहेत. सदर वर्णित जमिन मिळकत ही श्री. देवभूमि रिअल्टी प्रा.लि. यांच्या प्रत्यक्ष वहीवाटीत व ताबेकब्जात आहे. तरी सदर जमिन मिळकतीचे मालकी हक्काबाबत खात्री करुन घेण्याकरीता प्रस्तुत जाहिर नोटीस प्रसिद्ध करीत आहोत. सदर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे.

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे : मोसारे, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड**

| अ. क्रं. | गावाचे नाव | स.नं. | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | | | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | क्षेत्र | पो.ख. | एकूण | |
| १ | मोसारे | ८८/२/१ | ००.३९.८० | ००.१३.७० | ००.५३.५० | ०८.५० |
| २ | मोसारे | ८८/२/२ | ००.५३.०० | ००.००.०० | ००.५३.०० | ११.५६ |
| ३ | मोसारे | ८८/८ | ००.०८.१० | ००.०१.०० | ००.०९.१० | ०१.३७ |
| ४ | मोसारे | ८९/२ | ००.६२.४० | ००.०९.६० | ००.७२.०० | १३.२६ |
| ५ | मोसारे | ९०/१/A | ०१.७५.०० | ००.२५.०० | ०२.००.०० | ०३.०७ |
| ६ | मोसारे | ९०/१/C | ०१.७५.०० | ००.२५.०० | ०२.००.०० | ०३.०७ |
| ७ | मोसारे | ९०/२ | ००.३५.०० | ००.००.१० | ००.४०.०० | ००.६२ |
| ८ | मोसारे | १०३/१/२ | ००.७४.०० | ००.०२.०० | ००.७६.०० | ०२.१६ |
| | | | एकूण क्षेत्र | | ०७.०६.६० | |

प्राप्त परिस्थितीत वरील परिशिष्टा मध्ये नमूद केलेल्या जमिन मिळकतीमध्ये वा कोणत्याही भागावर कोणाही व्यक्तीचे कसल्याही प्रकारचे करार मदार, गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, तारण, भाडेरूपणाचा हक्क, पोटगी, साठेकरार, अखत्यारपत्र, एम.ओ.यु. वा तत्सत्म कोणतेही दावे, मालकी व अन्य हक्क हितसंबंध असल्यास त्या व्यक्तिींनी वा संबंधीतांनी हि नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत आपल्या हक्क, हितसंबंधाचे स्वरूप विषद कऊन कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचे पत्त्यावर लेखी कळवावे अगर समक्ष येवून भेटावे. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजाविरहित असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजून आमचे पक्षकार सदर मिळकतीचे हस्तांतरणाचे व्यवहाराचे काम पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या तक्रारी, दावे, हरकती, या रद्दबातल आहेत व त्या जाणीवपूर्वक सोडून दिल्या आहेत असे गृहीत धरले जाईल याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.

दि.१४/०९/२०२५

सही/-
**ॲड.मनिषा ज. कोळी**
**ॲडव्होकेट व नोटरी**
**मो.नं.९५९४४६१२६१**